RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. 02 जून 2026



१९१५- कोलंबिया विद्यापीठातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एम.ए. झाले.
१९३५- विधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नेमणुक.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

मंगळवार, ०२ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १५३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 02 June 2026 | Year : 6 | Issue : 153 | Daily | Rate: Rs. 5/-

# मी भारतात येतोय...

## 'शिक्षण मंत्र्याचा राजीनामा घेण्यासाठी ...

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील इतर कथित घोटाळ्यांवरून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण असतानाच, आता या प्रकरणाला एक वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावरील प्रसिद्ध कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके याने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी थेट अमेरिकेतून भारतात येण्याची घोषणा केली आहे. येत्या ६ जून रोजी तो दिल्लीत येणार असून, जंतर-मंतरवर मोठ्या आंदोलनाची तयारी त्यांनी सुरू केली आहे. सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या अभिजीत दीपकेने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडिओ पोस्ट करत भारतात येणार असल्याचे जाहीर केले. शनिवारी ६ जून रोजी सकाळी तो दिल्ली विमानतळावर उतरेल. त्याने त्याच्या समर्थकांना विमानतळावर येण्याचे आवाहन केले आहे. तेथून सर्व जण एकत्र संसद मार्ग पोलीस ठाण्यात जातील आणि जंतर-मंतरवर शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी रीतसर परवानगी मागणार आहेत. अभिजीत दीपके यांनी आपल्या व्हिडिओमध्ये केंद्र सरकारवर आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर कडक शब्दांत टीका केली. नीट परीक्षा वाद आणि पेपर फुटीमुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले असून तरुण प्रचंड चिंतेत आहेत. या अपयशाची जबाबदारी घेऊन शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, असं दीपकेने म्हटलं. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन याचिकेला लाखो लोकांचा पाठिंबा मिळाला असून देशाच्या विविध भागांतून विद्यार्थी या चळवळीत जोडले जात असल्याचे दीपकेने सांगितले.

> "आता वेळ आली आहे की आपण सर्वांनी भारतीय संविधानाच्या मार्गाने एकत्र यावे आणि शांततापूर्ण मार्गाने शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करावी. जर आपण सर्वांनी मिळून आवाज उठवला, तर सरकारला आपली मागणी नक्कीच ऐकावी लागेल," असे आवाहन दीपकेने त्याच्या समर्थकांना केले आहे.




भारतात पाऊल ठेवताच दिल्लीत आपल्याला ताब्यात घेतले जाण्याची किंवा अटक होण्याची भीती नातेवाईक आणि मित्रांनी व्यक्त केली आहे, अशी कबुली दीपकेने दिली. मात्र, माझा भारतीय लोकशाही आणि संविधानावर पूर्ण विश्वास आहे. संविधानाने नागरिकांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे आणि आपले आंदोलन पूर्णपणे लोकशाही मार्गानुसारच असेल,₹ असे दीपके म्हणाला.
व्हिडिओच्या शेवटी त्याने भावुक होत सांगितले की, मी परदेशात आरामात नोकरी करू शकत होतो, पण देश आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी जोडलेल्या या गंभीर मुद्द्यासाठी मी भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे.

# वैशाख पौर्णिमेनिमित्त धम्मदेसना कार्यक्रमातून ऊर्जाउत्साह प्रतिसाद



**नागपूर :** विश्वरत्न तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५८८ व्या जयंतीनिमित्त वैशाख पौर्णिमेच्या पावन पर्वावर नॉर्थ नागपूर महिला फोरम, नॉर्थ नागपूर सिनीयर सिटिझन फोरम आणि युवा ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला "धम्मदेसना" हा विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रम सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर, कामठी रोड, नागपूर येथे उत्साहात व मोठ्या प्रतिसादात झाला. कार्यक्रमाला समाजातील विविध क्षेत्रांतील नागरिक, महिला, युवक-युवती, विद्यार्थी तसेच धम्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भंते वन्ना स्वामी, भंते शिवाली आणि भंते महेंद्र रतन यांनी उपस्थितांना धम्मदेसना देत भगवान बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा, मैत्री आणि समतेच्या संदेशाचे महत्त्व विशद केले. आजच्या तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनात धम्माचे आचरण केल्यास मानसिक शांतता, सामाजिक समता आणि मानवी मूल्यांची जपणूक शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी धम्म, मानवता आणि सामाजिक बांधिलकी यांचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी अशा प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. याचना नंदीनी गौतम यांनी केली.प्रस्तावना पल्लवी आटे यांनी केली तर भंतेजींचा परिचय उषा उके यांनी दिला. महेंद्र रतन भंतेजींनी धम्म हा कुशल जीवनमार्ग कसा आहे यावर अतिशय ओघवत्या वाणीत प्रवचन दिले. भंते वन्ना स्वामी यांनी आजच्या काळात बौध्द जीवन पध्दतीचे महत्व आपण कसे राखावे यावर उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले तर भंते शिवली यांनी बौद्ध संस्कृतीचे निर्माण आणि निर्वहन कसे करावे यावर आपल्या ओजस्वी वाणीने प्रवचन दिले. याप्रसंगी धम्म प्रचारक व प्रबोधनकार पुष्पा बौद्ध आणि त्यांची चमू उपस्थित होती . कार्यक्रमासाठी युवा ग्रॅज्युएट फोरमच्या अभिजित मेश्राम राहुन हनवते, रोहिणी दहिवले सुमेध बौध्द, सोनु जांभुळकर, रोशन जांभुळकर, अशोक भेलावे, रंजना सुरजूसे, सचिन मेकाले, प्रतिभा मोटघरे, विरू, निखिल रामटेके शमा मनवर, श्वेता रंगारी, आरती हनवते सोनाली धवणे, शैलेश खोब्रागडे कैलाश खोब्रागडे, अशोक बागडे आणि धम्मानंद मनवर यांनी परिश्रम घेतले.

# महत्वाच्या बातम्या

## बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिवसेनेच्या यूबीटीची मागणी

**मुंबई :** पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या खासदारावर झालेल्या कथित हल्ल्याची चर्चा महाराष्ट्रातही होत आहे. राज्याच्या विधानसभेतील विरोधी पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (यूबीटी) ने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्या मुखपत्र 'सामना'मधील संपादकीयात पक्षाने बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी केली आहे. त्यात म्हटले आहे की, भाजप कार्यकर्त्यांनी तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि विद्यमान खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर केलेला कथित हल्ला 'जितका भ्याडपणाचा होता, तितकाच क्रूरही होता.' गेल्या दोन दिवसांत कोलकातामध्ये घडलेल्या धक्कादायक घटनांनी केवळ पश्चिम बंगालच्याच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का दिला आहे. एकेकाळी भारतातील सर्वात सुसंस्कृत राज्यांपैकी एक मानले जाणारे पश्चिम बंगाल आता हिंसाचार, द्वेष आणि जमावशाहीचे प्रतीक बनले आहे.

## नेपाळ-भारत सीमावादात मध्यस्थी करण्यास ब्रिटनचा नकार

**नेपाळ :** भारतासोबतच्या सीमावादात नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांना मोठा धक्का बसला आहे. सुगौली कराराचा हवाला देत बालेन शाह यांनी ब्रिटनकडून मध्यस्थीची आणि मदतीची मागणी केली होती. ब्रिटनने ही मागणी पूर्णपणे फेटाळून लावली आहे. भारत आणि नेपाळ यांच्यातील हा मुद्दा द्विपक्षीय असून ब्रिटन त्यात हस्तक्षेप करणार नाही, असे UKने स्पष्ट केले आहे. बालेन शाह यांना हा धक्का अशा वेळी बसला आहे, जेव्हा भारतासोबतच्या सीमावादावरून नेपाळच्या पंतप्रधानांवर देशांतर्गत तीव्र दबाव आहे.'द काठमांडू पोस्ट'नुसार, बालेन शाह यांनी अलीकडेच काठमांडूमध्ये ब्रिटिश राजदूत रॉब फेन यांची स्वतःचे मुख्य सल्लागार कुमार ब्यांजंकर यांच्यासह भेट घेतली. ब्यांजंकर यांनी सांगितले की, नेपाळ आणि भारत यांच्यातील सीमा निश्चित करणाऱ्या सुगौली करारात ब्रिटन एक पक्षकार आहे. त्यामुळे, सीमावाद सोडवण्यासाठी ब्रिटनने हस्तक्षेप केला पाहिजे. पण ब्रिटनने मदत करण्यास नकार दिला. सुगौली करार १८१६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी आणि नेपाळ यांच्यात झाला होता.

# अभिषेक आणि कल्याण बॅनर्जी हल्ला प्रकरणात ६ जणांना अटक

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ल्याचे प्रकरण ताजे असतानाच कल्याण बॅनर्जी यांच्यावरही हल्ला झाला. या घटनेनंतर तृणमूल काँग्रेस (TMC) आणि भाजपा आमनेसामने आले आहेत. दोन्ही राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत, तर दुसरीकडे पोलीस अभिषेक बॅनर्जी यांच्यासोबत झालेल्या मारहाणीच्या प्रकरणाचा तपास करत आहेत.
अभिषेक बॅनर्जींच्या हल्ला प्रकरणी पोलिसांनी आधी पाच जणांना अटक केली होती. त्यानंतर या प्रकरणात सहावी अटक झाल्याची माहिती समोर आली. सर्व आरोपी स्थानिक रहिवासी असून त्यांनी सोनारपूर येथे अभिषेक यांच्या दौऱ्यादरम्यान त्यांना विरोध केला होता. या घटनेनंतर नोंदवण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारे सोनारपूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले. भाजपा नेत्यांनी निवडणुकीच्या निकालानंतर जनतेमध्ये असलेला संताप हे या घटनेचे कारण असल्याचे सांगितले आहे.
भाजपाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी



अटक करण्यात आलेले सहाही जण अवघ्या एक महिन्यापूर्वीपर्यंत टीएमसीच्या माजी आमदार लवली मैत्रा यांचे जवळचे सहकारी होते. या खुलाशामुळे आता नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. टीएमसीमधील अंतर्गत वाद आता उघडपणे समोर येत आहे का? असा सवाल विचारला जात आहे. भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी माहिती दिली की, अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले सहा जण तृणमूल काँग्रेसच्या माजी आमदार लवली मैत्रा यांचे जवळचे सहकारी होते, जे महिनाभरापूर्वीपर्यंत त्यांच्यासोबत कार्यरत होते.

# कर्नाटकमध्ये राज्यसभेच्या चार आणि विधान परिषदेच्या सात जागांसाठी निवडणुका १८ जूनला

**बंगळूर :** कर्नाटकातील राज्यसभेच्या चार आणि विधान परिषदेच्या (एमएलसी) सात जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सोमवारी सुरू झाली. निवडणूक आयोगाने अधिसूचना जारी केली असून, १८ जून रोजी राज्य विधानसभा संकुलातील विधान सौध येथे मतदान होणार आहे. या निवडणुकीत कर्नाटक विधानसभेचे सदस्य आपला मतदानाचा हक्क बजावतील. भाजपचे इराणा काडाडी आणि नारायण कोरगप्पा, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा कार्यकाळ २५ जून रोजी संपत



असल्याने राज्यसभेच्या निवडणुका होत आहेत. दरम्यान, विधान परिषदेच्या सात जागांसाठी निवडणुका होत आहेत, कारण आमदारांनी निवडून दिलेल्या सदस्यांचा कार्यकाळ ३० जून रोजी संपत आहे. यामध्ये काँग्रेसचे गोविंद राजू, नसीर अहमद, टिपन्नप्पा आणि बी. के. हरिप्रसाद, तसेच भाजपचे एन. नागराज (एमटीबी), प्रताप सिंह नायक आणि सुनील वल्यापूर यांचा समावेश आहे. निवडणूक वेळापत्रकानुसार, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून आहे. नामनिर्देशनपत्रांची छाननी ९ जून रोजी होईल, तर उमेदवार ११ जूनपर्यंत आपली नामनिर्देशनपत्रे मागे घेऊ शकतील. मतदान आणि मतमोजणी दोन्ही १८ जून रोजी होतील. विधानसभेतील सध्याच्या संख्याबळाच्या आधारावर, सत्ताधारी काँग्रेस चारपैकी तीन राज्यसभा जागा आणि सातपैकी पाच विधान परिषद जागा जिंकेल असा अंदाज आहे.

# विधान परिषद निवडणुकीसाठी महायुती आणि मविआची उमेदवार यादी जाहीर

**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या निवडणुका लागल्या नव्हत्या. त्यामुळे गेल्या अडीच वर्षांपासून या आमदारकीच्या जागा रिक्त आहे. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जातात. यंदा सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा- गोंदिया, नाशिक आणि अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. दरम्यान, आज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. दुपारी ३ पर्यंत अर्ज भरता येणार होते. या



निवडणुकीसाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामुळे प्रचंड दावे-प्रतिदावे झाले. महायुती आणि महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षांतर्गतच बंडाळी झाल्याचे दिसले. पुण्यातून सुनील टिंगरे आणि विक्रम काकडे या दोघांनीही राष्ट्रवादीच्या तिकिटावर अर्ज भरला आहे. तर, छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीत वाद झाला. या जागेवरून भाजपाने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली आहे, तर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या समीर सत्तार यांनीही अपक्ष अर्ज भरला आहे. प्रचंड रस्सीखेच आणि दावे-प्रतिदावे झाल्यानंतर महायुतीतून १७ जगांसाठी उमेदवारांची नाव निश्चित झाली आहेत. भाजपा ११, शिवसेना (एकनाथ शिंदे) ४, राष्ट्रवादी (अजित पवार) २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत.

# पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्यावर संपूर्ण शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार

**मुंबई :** पार्श्वगायिका आणि पद्मभूषण पुरस्कार विजेत्या सुमन कल्याणपूर यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर मुंबईतील सांताक्रूझ (पवन हंस) स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या असाधारण योगदानाबद्दल शासकीय सन्मानाचे आदेश दिले. अंत्ययात्रेदरम्यान, शोकाकुल लोकांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यांनी कल्याणपूर यांच्या मधुर आवाजाची आणि भावपूर्ण गायनाची आठवण काढली. केंद्रीय मंत्री, राजकीय नेते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील लोकांनीही त्यांना श्रद्धांजली वाहिली. कल्याणपूर यांची कारकीर्द १९५४ ते



१९८८ अशी तीन दशकांहून अधिक काळ चालली. त्यांना २०२३ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते

# नीट प्रकरणी सीबीटी पद्धतीने परीक्षा घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## आरोपीला १५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**यंत्रणांवर मोठा ताण :** परीक्षा रद्द झाली असून तिचे पुन्हा आयोजन करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत संबंधित यंत्रणांवर मोठा ताण आहे. या टप्प्यावर अशा प्रकारचा आदेश देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे न्यायमूर्ती नरसिंहा यांनी म्हटले. याचिकाकर्त्यांनी केवळ सीबीटी पद्धतीची मागणी कायम असल्याचे पुन्हा नमूद केल्यानंतरही न्यायालयाने तत्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला आणि प्रकरण सुट्टीनंतर घेण्यात येईल, असे स्पष्ट केले. ही याचिका एनटीएमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील इतर प्रलंबित याचिकांसोबत जोडण्यात आली आहे. दरम्यान, मे महिन्यात झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने नीट-यूजी परीक्षा रद्द होण्याबाबत चिंता व्यक्त केली होती. तसेच माजी इस्त्रो अध्यक्ष के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकार आणि एनटीएकडून अहवाल मागविला होता.

**नवी दिल्ली :** २१ जून रोजी होणारी नीट-यूजी २०२६ची पुनर्परीक्षा सध्याच्या लेखी (पेन-अँड-पेपर) पद्धतीऐवजी संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. न्या. पी.एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) खासदार सुधाकर सिंह यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित वकिलांनी इतर सर्व मागण्या बाजूला ठेवून केवळ पुनर्परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्याची मागणी असल्याचे न्यायालयाला सांगितले.
३ मे रोजी झालेली नीट-यूजी २०२६ परीक्षा मोठ्या प्रमाणावर प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय निर्माण झाल्यानंतर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत नीट परीक्षा पूर्णपणे संगणकाधारित पद्धतीने घेण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात आली होती. याशिवाय, विद्यमान एनटीएच्या जागी तांत्रिक सुरक्षाव्यवस्था, जबाबदारीची स्पष्ट यंत्रणा आणि स्वतंत्र देखरेखीची व्यवस्था असलेली वैधानिक राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरण स्थापन करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली होती. निवृत्त सर्वोच्च न्यायालयीन न्यायाधीश, शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश असलेली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली होती. प्रश्नपत्रिकांचे एनक्रिप्टेड डिजिटल प्रसारण, बायोमेट्रिक पडताळणी, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित देखरेख, अधिक सक्षम सायबर सुरक्षा व्यवस्था, प्रश्नपत्रिकांचे 'डिजिटल लॉकिंग' तसेच पेपरफुटी प्रकरणातील आरोपी, मध्यस्थ, कोचिंग संस्था आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्याची विनंतीही याचिकेत करण्यात आली होती. तसेच कथित पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीबाबत केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) स्थिती अहवाल मागविण्याची मागणीही करण्यात आली होती. सीबीटी आधारित परीक्षा घेण्याचे निर्देश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. या मागणीसंदर्भातील याचिकेवरील सुनावणी न्यायालयाने जुलै महिन्यापर्यंत पुढे ढकलली. त्यामुळे आगामी पुनर्परीक्षेसाठी तातडीचा दिलासा मिळण्याची शक्यता संपुष्टात आली आहे.




PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
◆ IDEAL FOR ◆
● Hostel/ Student Accommodation ● New College/ Educational Institution ● Residential College Campus ● Car/ Motorcycle Showroom ● Warehouse / Godown ● Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

बहुजन सौरभ

# संपादकीय

## झोपडपट्टी पुनर्वसन
## विकास, विस्थापन व सामाजिक न्याय

शहरांच्या वाढत्या विकासाच्या नावाखाली झोपडपट्ट्यांवरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाया मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. रस्त्यांचे रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, रेल्वे विस्तार, स्मार्ट सिटी योजना, नदी संवर्धन प्रकल्प आणि इतर विकासकामांसाठी अनेक झोपडपट्ट्या हटविल्या जात आहेत. त्यामुळे झोपडपट्टीधारकांनी आता काळाची पावले ओळखून सावध होण्याची गरज आहे. केवळ शासनावर किंवा राजकीय नेत्यांवर अवलंबून राहण्याऐवजी प्रत्येक कुटुंबाने आपल्या भविष्यासाठी पर्यायी निवाऱ्याचा विचार करणे आवश्यक झाले आहे. एकेकाळी झोपडपट्टीवासीयांच्या प्रश्नांसाठी विविध सामाजिक संघटना, कामगार चळवळी आणि राजकीय पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करीत असत. झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी मोर्चे, आंदोलने आणि उपोषणे होत असत. गरीबांच्या निवाऱ्याचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा प्रश्न मानला जात होता. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. संघटनांची ताकद कमी झाली आहे, नेतृत्व विखुरले आहे आणि झोपडपट्टीवासीयांसाठी प्रभावीपणे लढणारे आवाज कमी होत चालले आहेत. त्यामुळे स्वतःची जबाबदारी स्वतः स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. भारतातील शहरीकरण झपाट्याने वाढले आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि चांगल्या जीवनमानाच्या शोधात लाखो लोक गावाकडून शहरांकडे स्थलांतरित झाले. ग्रामीण भागातील दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक विषमता आणि जातीय भेदभाव यामुळे अनेक कुटुंबांनी शहरांचा मार्ग स्वीकारला. परंतु शहरांचा विस्तार ज्या वेगाने झाला, त्या वेगाने परवडणाऱ्या घरांची निर्मिती झाली नाही. परिणामी रेल्वे मार्गांजवळ, नाल्यांच्या काठावर, सरकारी रिकाम्या जागांवर आणि शहरांच्या कडेला झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. आज मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, सोलापूर आणि इतर शहरांमध्ये लाखो लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. या वस्त्यांमध्ये राहणारे नागरिक शहराच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. घरकाम करणाऱ्या महिला, बांधकाम मजूर, रिक्षाचालक, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी, फेरीवाले आणि छोटे व्यावसायिक हे सर्व शहराला गतिमान ठेवतात. शहरांच्या विकासामागे त्यांच्या श्रमांचा मोठा वाटा असतो. तरीही त्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक निवारा मिळत नाही, ही सामाजिक विषमता आहे. झोपडपट्टीतील जीवन अनेक समस्यांनी वेढलेले असते. अरुंद गल्ल्या, अस्वच्छ वातावरण, दूषित पाणी, सार्वजनिक शौचालयांची कमतरता, आरोग्याच्या समस्या आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात घरांमध्ये पाणी शिरते, आग लागण्याचा धोका असतो आणि साथीचे रोग पसरण्याची भीती कायम असते. अशा परिस्थितीत झोपडपट्टी पुनर्वसन ही केवळ विकासाची नव्हे, तर मानवी सन्मानाची गरज आहे. मात्र पुनर्वसन म्हणजे केवळ झोपड्या तोडून उंच इमारती बांधणे नव्हे. पुनर्वसनाचा उद्देश नागरिकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणे हा असला पाहिजे. अनेकदा विकासाच्या नावाखाली झोपडपट्ट्या हटविल्या जातात; परंतु पर्यायी व्यवस्था अपुरी किंवा निकृष्ट दर्जाची असते. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गंभीर होतात. पुनर्वसन करताना सर्वात महत्त्वाचीबाब म्हणजे लोकांचा सहभाग. कोणत्याही वस्तीतील नागरिकांना विश्वासात घेतल्याशिवाय पुनर्वसन यशस्वी होऊ शकत नाही. त्यांची मते, गरजा आणि अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. लोकांच्या सहभागाशिवाय केलेले पुनर्वसन अनेकदा संघर्ष आणि न्यायालयीन वादांना कारणीभूत ठरते. अनेक वेळा पुनर्वसन शहराच्या बाहेरील भागात केले जाते. त्यामुळे नागरिकांच्या रोजगारावर परिणाम होतो. रोजच्या प्रवासाचा खर्च वाढतो आणि अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटते. परिणामी काही कुटुंबे पुन्हा झोपडपट्ट्यांमध्ये राहण्यास भाग पडतात. त्यामुळे पुनर्वसन शक्यतो मूळ परिसरात किंवा रोजगाराच्या ठिकाणाजवळच झाले पाहिजे. फक्त चार भिंती उभ्या केल्याने घर तयार होत नाही. पुनर्वसित नागरिकांना स्वच्छ पाणी, वीज, शाळा, रुग्णालय, सार्वजनिक वाहतूक, खेळाची मैदाने आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. पुनर्वसन प्रकल्प हे जीवनमान उंचावणारे असले पाहिजेत. झोपडपट्टी पुनर्वसनातील सर्वात मोठी समस्या म्हणजे भ्रष्टाचार. बनावट कागदपत्रे, अपात्र लाभार्थी, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे अनेक प्रकल्पांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे पुनर्वसन प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि लोकाभिमुख असणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी विविध गृहनिर्माण योजना सुरू केल्या आहेत. परंतु योजनांची प्रभावी अंमलबजावणी हीच खरी गरज आहे. गरीबांसाठी परवडणारी घरे, कमी व्याजदराचे कर्ज, सार्वजनिक गृहनिर्माण आणि भाडे नियंत्रण यासारख्या उपाययोजनांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. नगर नियोजन करताना गरीब आणि कामगार वर्गासाठी स्वतंत्र जागा राखून ठेवली पाहिजे. झोपडपट्टीवासीयांनीही केवळ राजकीय आश्वासनांवर विसंबून राहू नये. आपल्या झोपडीची कागदपत्रे, ओळखपत्रे, रहिवासी पुरावे आणि शासकीय नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. शासनाच्या गृहनिर्माण योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बचत, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सामूहिक प्रयत्नांद्वारे पर्यायी निवाऱ्याचे पर्याय शोधले पाहिजेत. झोपडपट्टीतील नागरिक गुन्हेगार नाहीत; ते परिस्थितीचे बळी आहेत. त्यांनी आपल्या कष्टाच्या बळावर शहर उभे केले आहे. त्यामुळे त्यांना सन्मानाने जगण्याचा आणि सुरक्षित निवारा मिळण्याचा पूर्ण अधिकार आहे. विकासाच्या नावाखाली गरीबांना शहराबाहेर ढकलणे हा उपाय नाही. विकास तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा समाजातील सर्व घटक त्याचा लाभ घेऊ शकतात. आज गरज आहे ती संवेदनशील, न्याय्य आणि लोककेंद्रित पुनर्वसन धोरणाची. झोपडपट्टी हटविणे हे अंतिम उद्दिष्ट नसावे; तर झोपडपट्टीतील नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच खरे ध्येय असावे. शहरे केवळ उंच इमारतींनी महान होत नाहीत. शहर तेव्हाच महान बनते, जेव्हा तेथील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित निवारा, स्वच्छ वातावरण आणि सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळते. म्हणूनच झोपडपट्टीधारकांनो सावधान! बदलत्या काळाची जाणीव ठेवा, आपल्या हक्कांबाबत जागरूक राहा, कागदपत्रे व्यवस्थित ठेवा आणि भविष्यासाठी पर्यायी निवाऱ्याचा विचार आजपासूनच सुरू करा. कारण विकासाच्या वाढत्या वेगात असुरक्षितता टाळायची असेल, तर दूरदृष्टी आणि सजगता हाच सर्वात मोठा आधार आहे.●●

# त्रिपिटक



बौद्ध पत्रकारिता ही एक साधना आहे. ज्यात त्रिपिटक हे बुद्धांच्या शिकवणीचा अमर खजिना आहे. ते पत्रकारितेला मार्गदर्शन करतात. वैचारिक आधार देतात. त्रिपिटक ही बौद्ध पत्रकारितेची मूलभूत आधारशिला आहे. त्रिपिटक म्हणजे विनय पिटक (शिस्तीची टोपली), सुत्त पिटक (उपदेशांची टोपली) आणि अभिधम्म पिटक (अंतिम तत्त्वज्ञानाची टोपली). हे तीन भाग एकत्र येतात. तेव्हा बौद्ध धम्माचे संपूर्ण धम्म ग्रंथ बनते. ज्याप्रमाणे तीन नद्या एकत्र येतात. तेव्हा त्यातून महासागर निर्माण होतो. जगातील आजच्या मीडियात असत्य बातम्या वाढल्यात. त्यांना फेक न्यूज संबोधले जाते. त्यात द्वेष आहे. नफ्याची हाव आहे. स्पर्धेची घाई आहे. या प्रवृत्तीचे साम्राज्य वाढले आहे. तिथे त्रिपिटक एक शांत, प्रखर आणि करुणामय दिवा आहे. तो पत्रकाराला सांगतो. तू केवळ बातमी देऊ नकोस. तू शिस्त पाळ. सत्य सांग. सत्याच्या मार्गाने जाण्याबाबत उपदेश कर. गहन तत्त्वज्ञानाने विश्लेषण कर. ही पत्रकारिता प्रभावी असते. कारण तिच्यात नैतिकता असते. ती सखोल आणि दीर्घकालीन विश्वास निर्माण करते. ती परिणामकारक असते. कारण ती केवळ समस्या दाखवत नाही. तर समाजाला शिस्त, बोध आणि मुक्तीच्या मार्गावर नेते. ती भावनिक असते. कारण ती हृदयाला स्पर्श करते. ती वेदना अनुभवते. करुणेचा सागर निर्माण करते. तिची भाषा प्रवाही असते. अमर्याद शांततामय असते. जसे पावसाळ्यातील शांत सरोवरात उमलणारे कमळ. ज्यात दुःखाचे काळे ढग दूर होतात. आशेचा प्रकाश पसरतो. विनय पिटक- पत्रकारितेचा नैतिक आधार विनय पिटक आहे. ही धम्म संघाची शिस्त, भिक्षू, भिक्षुणींच्या आचार-विचाराचे नियम आहेत. संघटनेचे नियम आहेत. त्यात पातिमोक्ख (२२७ नियम भिक्षूंसाठी, ३११ भिक्षुणीसाठी), महावग्ग, चुल्लवग्ग आणि परिवार यांचा समावेश आहे. हे नियम केवळ बाह्य शिस्त नव्हे. तर अंतर्मनातील शुद्धता शिकवतात. अहिंसा, सत्य, चोरी न करणे, व्यभिचार टाळणे. बौद्ध पत्रकारितेत विनय ही नैतिक पत्रकारितेची गुरुकिल्ली आहे. आजची पत्रकारिता जाहिरातींसाठी सत्य विकते. राजकीय दबावाखाली लिहिते. सनसनाटी छायाचित्र वापरते. पण विनय पिटक सांगते. तुमची पेन ही शस्त्र नाही. ती धम्मचक्र आहे. ती जखमा करीत नाही. जखमेवर मलम लावावे. दुःख दूर करते. कल्पना करा, एखाद्या सामाजिक अत्याचाराच्या वृत्त संकलनाची कल्पना करा. सामान्य पत्रकारिता पीडितेचा चेहरा उघडा करेल. रडणारे फोटो छापेल. रेटिंग कमवेल. पण विनयानुसार बौद्ध पत्रकार नियम पाळतो. पीडितेचा आदर करतो. गोपनीयता राखतो. फक्त आवश्यक तेवढेच उघड करतो. तो लिहितो. त्या अंधाऱ्या रात्री एका मुलीची चीख आली. मी ती चीख ऐकली. पण माझ्या कॅमेराने तिच्या वेदनेला शोषित केले नाही. विनय सांगतो. दुसऱ्याच्या जखमेवर मीठ चोळू नकोस. करुणेचे मलम लाव. ही शैली प्रभावी असते. कारण ती विश्वास कमावते. लोक जाणतात की हा पत्रकार नैतिक आहे. तो फक्त स्कूपसाठी सत्याचा बळी देत नाही. परिणामकारक असते कारण असे वृत्त समाजात शिस्त रुजवतात. भ्रष्टाचार, हिंसा आणि अन्याया विरुद्ध नैतिक लढा देतात. विनय ही ती लोखंडी साखळी नाही.जी बांधते. ती सोनेरी श्रृंखला आहे. जी मुक्तीच्या मार्गावर नेते. पत्रकार त्या शिस्तीत राहतो. तेव्हा त्याचे शब्द अमर होतात. परिणाम करतात. जसे संघात भिक्षू नियम पाळून शांत राहतो. तसेच पत्रकार आपल्या पेनला विनयाने नियंत्रित करतो. मग त्याचे लिखाण केवळ बातम्या राहत नाहीत. ते एक पवित्र उपदेश बनतात. ज्यातून न्याय आणि शांती उमलते. सुत्त पिटक - ही बुद्धांच्या प्रत्यक्ष उपदेशांची टोपली आहे. त्यात दीघ निकाय, मज्झिम निकाय, संयुत्त निकाय, अंगुत्तर निकाय आणि खुद्दक निकाय (ज्यात धम्मपद, जातक कथा, थेरगाथा, थेरिगाथा इत्यादी) यांचा समावेश आहे. यात हजारो सुत्ते आहेत. ज्यात बुद्ध विविध लोकांना, राजे, गरीब, स्त्रिया आदींना उपदेश देतात. हे उपदेश चार आर्यसत्य, अष्टांगिक मार्ग, करुणा आणि अनिच्चता शिकवतात. बौद्ध पत्रकारितेत सुत्त पिटक ही कथा सांगण्याची आणि बोध देण्याची कला शिकवते. आजची पत्रकारिता सेन्सेशनल स्टोरीज सांगते. पण सुत्त पिटक सांगते. कथा सांग, पण ती दुःख कमी करणारी असावी, करुणा जागृत करणारी असावी. उदाहरणार्थ- एखाद्या शेतकऱ्यांच्या संकटाची कहाणी. बौद्ध पत्रकार सुत्तासारखी कथा विणतो. जसे बुद्धाने अंगुत्तर निकायात सांगितले की, तृष्णा दुःखाचे मूळ आहे. तसेच त्या शेतकऱ्याच्या हातात कर्जाचा बोझा आणि पावसाचा अभाव आला. तेव्हा त्याची तृष्णा सुखाची, सुरक्षिततेची होती. ती त्याला आत्महत्येकडे घेवून गेली. पण सुत्त सांगते. हे दुःख संपवता येईल. त्यासाठी शिक्षण, संघटन आणि करुणा जीवनात अंगिकारण्याचा मार्ग दाखविते. सल्ला देते.ही शैली भावनिक असते. ती वाचकाला बुद्धांच्या काळात घेऊन जाते. त्या शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू मी पाहिले. जसे बुद्धाने अनाथपिंडिकाच्या बागेत बसून लोकांच्या दुःखाला ऐकले. ही भाषा परिणामकारक असते कारण असे वृत्त लेख वाचकाला प्रेरित करतात. तो फक्त वाचत नाही. तर कृती करतो. असे वृत्त प्रभावी असतात. कारण सत्य मांडतात. जगण्याचे धाडस शिकवितात. “सुत्त पिटक ही ती अमृतवाणी आहे. जी हजारो वर्षांनंतरही हृदयात गुंजते. बौद्ध पत्रकार त्या वाणीचा वारस बनतो. त्याच्या बातम्या धम्मपदा सारख्या होतात. ज्यात प्रत्येक शब्दात शांती असते. बोध असतो. जसे कमळ पाण्यात राहूनही पाण्याने भिजत नाही तसेच सत्यवादी पत्रकार द्वेषाच्या वातावरणात राहूनही द्वेष अंगिकारित नाही. अभिधम्म पिटक- ही उच्च तत्त्वज्ञानाची टोपली आहे. त्यात धम्मसंगणी, विभाग, धातुकथा, पुग्गलपञ्ञत्ति, कथावत्थु, यमक आणि पट्ठान यांचा समावेश आहे. हे मन (चित्त), मानसिक घटक (चेतसिक), रूप (भौतिक) आणि निर्वाण यांचे सूक्ष्म विश्लेषण करते. अभिधम्म बुद्धांच्या उपदेशांचे वैज्ञानिक, मनोवैज्ञानिक आणि तार्किक विश्लेषण आहे. बौद्ध पत्रकारितेत अभिधम्म ही सखोल विश्लेषणाची शक्ती देते. तो फक्त ‘काय झाले’ सांगत नाही. तर ‘का झाले’ आणि ‘कसे बदलता येईल’ याचे गहन विश्लेषण करतो. आजच्या मीडिया मध्ये वरवरचे रिपोर्टिंग असते. अभिधम्म सांगते “मनुष्य हा पंचस्कंधांचा संग्रह आहे . रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान. दुःख याच स्कंधांच्या आसक्तीमुळे येते. उदाहरणार्थ, भ्रष्टाचाराच्या बातमीत बौद्ध पत्रकार अभिधम्मासारखे विश्लेषण करतो: तो अधिकारी लोभाने (तृष्णेने) बांधला गेला. त्याचे चित्त अशांत झाले.चेतसिक द्वेषाने भरले. अभिधम्म सांगते हे अनात्म आहे. अनिच्च आहे. सत्य आणि करुणेने तो मुक्त होऊ शकतो.ही शैली परिणामकारक असते. कारण ती समस्येच्या मुळापर्यंत जाते. उपाय सुचवते. ती प्रभावी असते कारण ती बौद्धिक गहनता देते. अभिधम्म ही ती सूक्ष्म दृष्टी आहे. जी दुःखाच्या काळ्या रात्रीतही प्रकाश पसरवते. जसे पट्ठानात कारण-परिणामाचे जाळे दिसते. तसेच पत्रकार समाजातील अन्यायाचे जाळे उलगडतो आणि निर्वाणाच्या आशेने भरतो. बौद्ध पत्रकारितेत त्रिपिटकाचे तीन भाग एकत्र येतात. तेव्हा बौद्ध पत्रकारिता पूर्ण होते. विनय नैतिक शिस्त देतो, सुत्त बोध आणि करुणामय कथा देतो, अभिधम्म प्रज्ञा आणि गहन विश्लेषण देतो. एका महिला सक्षमीकरणाच्या वृत्तात विनय पीडितेचा आदर राखतो. सुत्त तिच्या कहाणीला बोधपूर्ण रूप देतो. अभिधम्म सामाजिक-मानसिक मुळे शोधतो. अशी बातमी, लेख प्रभावी, परिणामकारक, भावनिक ठरते. “त्रिपिटक ही तीन टोपल्या आहेत एकात शिस्त, दुसऱ्यात उपदेश, तिसऱ्यात प्रज्ञा. बौद्ध पत्रकार त्या टोपल्यांमधून अमृत घेऊन येतो आणि समाजाला वाटतो. त्या अमृतात दुःख विरघळते, आशा उमलते. भारतात डॉ. आंबेडकर यांच्या लेखनात त्रिपिटकाचा प्रभाव दिसतो. त्यांनी दलितांच्या दुःखाला विनयाने नैतिक लढा दिला. सुत्ताने बोध दिला. अभिधम्माने जातिव्यवस्थेचे विश्लेषण केले. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियावर द्वेष पसरवणाऱ्या पोस्ट्सच्या विरोधात त्रिपिटक आधारित पत्रकारिता शांती आणि सत्य पसरवते. त्रिपिटकावर आधारलेली पत्रकारिता केवळ बातम्या देत नाही. ती धम्मचक्र फिरवते. भाषा चित्रात्मक असते. विनयाचा पाया मजबूत असते. सुत्ताची वाणी मधुर, अभिधम्माचा दिवा प्रखर असतो. एकत्रितपणे ते एक विहार उभे करतात. ज्यात पत्रकार सत्याची पूजा करतो. ही पत्रकारिता परिणामकारक असते .कारण ती समाजात शिस्त, बोध आणि प्रज्ञा रुजवते. भावनिक असते कारण ती वाचकाला बोधिसत्त्व बनवते. प्रभावी असते कारण ती दीर्घकाळ टिकणारा विश्वास निर्माण करते. आज जेव्हा मीडिया अस्थिर आहे. तेव्हा त्रिपिटक नवीन आधार आहे. प्रत्येक पत्रकाराने स्वतःला विचारावेः “माझ्या लेखनात विनय आहे का? सुत्ताचा बोध आहे का? अभिधम्माची प्रज्ञा आहे का? त्रिपिटक बौद्ध पत्रकारितेचा अमर खजिना आहे. त्रिपिटक बौद्ध पत्रकारितेला पूर्णतः देते. ते शिस्त, उपदेश आणि तत्त्वज्ञान यांचा संगम आहे. जेव्हा पत्रकारिता या तीन टोपल्यांवर उभी राहते. तेव्हा ती केवळ चौथा स्तंभ राहत नाही. ती धर्मदूत बनते, जे दुःख मुक्तीचा संदेश घेऊन फिरते. त्रिपिटक ही त्या तीन टोपल्या आहेत. ज्यात बुद्धांनी अमृत भरले. बौद्ध पत्रकार त्या टोपल्यांमधून घेऊन येतो आणि जगाला वाटतो. त्या अमृतात द्वेष विरघळतो. करुणा फुलते. प्रज्ञा प्रकाशते. समाज निर्वाणाच्या दिशेने वाटचाल करतो. बौद्ध पत्रकारिता ही पेनाची साधना आहे. विनयाने शुद्ध, सुत्ताने करुणामय, अभिधम्माने प्रज्ञावान. ही प्रभावी, परिणामकारक, भावनिक आहे. कारण ती बुद्धांच्या शब्दांतून जन्म घेते आणि मानवतेच्या हृदयात शांती पसरवते.●●

**बौद्ध पत्रकारिता-७**



भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019

# बौद्ध धम्मसंहिता आणि शिष्टाचार
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर



हजारो वर्षांची नर्कतुल्य गुलामी एका आयुष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्वत्ता व नैतिकतेच्या बळावर समूळ नष्ट केली. मुक्तपणे स्वेच्छेने स्वास घेण्याचा अधिकार गुलामांना मिळवून दिला. हाड, मास, रक्ताच्या निर्जीव शरिरात जीव फुंकला. माणसाला माणूसपण दिले. ३३ कोटी भारतीय देवी देवतांच्या शेकडो वर्षाच्या बंधनातून मानव समाज मुक्त केला. हे स्वप्न नव्हे हे भारत देशात घडलेले सत्य आहे . ही कथा नव्हे सत्यकथा आहे. मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण केल्याने भीवाला सेवाभावी केळुस्कर गुरुजींनी पुरस्कारात दिलेला स्वलिखित “भगवान बुद्धाचे चरित्र” ग्रंथ भीवाच्या जिवनात मैलाचा दगड ठरला. बुद्धाने भीवाच्या जिवनात प्रवेश केला. बुद्धाने सर्वसामान्य माणसासाठी ठरविलेली आचार संहिता व शिष्टाचाराची भीवाला तोंड ओळख तर उच्च शिक्षणाने पूर्ण ओळख झाली. आपण देशाचे मूलनिवासी असताना हिंदू धर्म आपला असताना हिंदू समाजात विषमता कां? खरंच हिंदू धर्म आपला नाही का? फार पूर्वी उच-नीच, श्रेष्ठ- कनिठ, रुढी-परंपरेला बुद्धाने छेद कां दिला? धर्म, वंश, वर्ण, जाती- व्यवस्था, होम, हवन, यज्ञ, पशूबळी, अंधश्रद्धा,चमत्कार, कर्मकांड, धर्मांधता, अहंकार, व्यभिचार, लाभ. बुद्धाने त्याज्य का केले ? त्याऐवजी कुशल कार्य व कुशल संस्काराला महत्व कां दिले? यावर विद्वत्ताप्रचूर डॉ. बाबासाहेबानी खूप चिंतन मनन केले. बुद्धाने अनित्य बोधाचे, रहस्य उलगडले. हे समजून घेतले. ते बौद्धांसाठी आचारसंहिता व शिष्टाचार कां व्हावे याचे स्वतः संस्लेशन, विश्लेशन केले. देशातील अत्याचारी अनुभवाने डॉ. बाबासाहेब फार घायाळ झाले. बुद्धाची मानवी मुल्य जपणारी संहिता व त्यातील शिष्टाचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर फार प्रभावित झाले. मानवी जीवनाच्या ज्या संकल्पना त्यांनी मनात रेखाटल्या त्या तथागत बुद्धाने, २५०० वर्षांपूर्वी भारत देशात प्रचलित केल्या याचे त्यांना समाधान झाले. त्यांनी बुद्धधम्म जवळ केला. स्वतः पुन्हा पुन्हा त्यांच्या जवळ गेले. हिंदू धर्माने पीडित केलेल्या समाजाच्या उत्थानासाठी जी समिकरणे आपल्या मनात डॉ. बाबासाहेबांनी आखली ती सर्व समिकरणे तथागत बुद्धाने धम्माच्या संहितेत २५०० वर्षांपूर्वी सहज सोडवल्याचे पुरावे डॉ. बाबासाहेबांना आढळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यामुळे सुखावले. अचंबितही झाले. उंच, नीच , अज्ञान, अहंकार, दासता, कामवासना, लैंगिक अत्याचार, हुकूमशाहीला हिंदू धर्मात असलेली मान्यता बुद्ध धम्मात नाही. स्वाभिमान, सदाचार, शीलाचार, सत्याला बुद्धधम्मात बुद्धाने अनन्यसाधारण महत्व दिले. बुद्धाने ईश्वरकृपा, नवस, पशुबली, देवदासी, जोगिणी पद्धतीचा, परावलंबनाचा धिक्कार केला. बुद्ध धम्मात संधी मिळताच स्त्रिया सुद्धा स्वबळावर संबोधी प्राप्त करू शकतात; इतके उंच स्थान शाक्यमुनी तथागत बुद्धाशिवाय कोणत्याही धर्म संस्थापकाने स्त्रियांना दिले नाही. हे समजल्याने डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा ओढा बुद्धधम्माकडे अधिकच वाढला. बुद्धाच्या धम्म-विनयात इश्वर-परमेश्वर, आत्मा-परमात्मा, स्वर्ग-नरक, ईश्वरदूत-इश्वरपुत्र या संकल्पना पुरोहितवाद नाही. बौद्ध भिक्षू वैराग्य आणि त्यागाचे प्रतीक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व बाबिंचे परिशिलन करून व्यक्ती स्वातंत्र्य देणारा शाक्यमुनी गौतम बुद्धाचा बुद्ध धम्म स्वीकारला व ७ (सात) लक्ष अनुयायांना दिला. नागपूरच्या दीक्षाभूमीवर १९५६ ला चक्रवर्ती सम्राट अशोक विजयादशमीच्या दिवशी न भूतो न भविष्यती हा धम्मदीक्षेचा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याची दखल जगाया इतिहासात सुवर्ण अक्षराने कोरली गेली. बुद्धधम्म विनयात लोकतंत्र, कुशल-प्रवृत्ती, सदाचार - प्रवृत्तीस, सम्यक श्रद्धेचे स्थान आहे. धम्म विनयात प्रज्ञा, शील, समाधी, अहिंसा, करुणा, मैत्री, त्याग, वैराग्याचे पालन होते. सत्य, नीती, सदाचार, कुशल कर्माने उत्क्रांतीवादाच्या दृष्टीतून जगातील सर्व धर्मांचे अवलोकन व मुल्यांकन करण्यासाठी बुद्धाचा धम्मविनय आदर्श ठरतो. याच संदर्भात डॉ. बाबासाहेबांनी संहिता व शिष्टाचारात २२ प्रतिज्ञा निश्चित केल्या. बुद्धाच्या सहिंतेत व शिष्टाचारांत विषमतेला, शोषण प्रक्रियेला, अवडंबराला स्थान नाही. येथे सम्यक आजिविका सिद्ध मानली गेली. प्रत्येक मनुष्य, पशू योग्य आहार, औषधी, शिक्षण प्रशिक्षणाने, त्यांच्या शारीरिक, बौद्धिक क्षमतेनुसार तयार केला जाऊ शकतो. त्याच्या यौग्यतेनुसार सम्यक कामधंदा, रोजगार मिळाल्यास सम्यक. संहिता व शिष्टाचाराचे साम्राज्य स्थापित होऊ शकते. कष्टाला रचनात्मक प्रतिष्ठेचे कार्य समजल्यास उच-नीच, वर्ण-विषमता, जाती विषमता समूळ नष्ट होईल. अत्याचार, दुराचार, अन्याय, विध्वंस, हत्या हिंसेला आळा बसेल. अहिंसा, क्षमाशीलता, सहिष्णुता वाढेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आत्मनिर्भरता, स्वावलंबनाच्या नियुक्ती मार्गाची पीडित अस्पृश्य बहिष्कृत समाजाला शिक्षा, दीक्षा दिली. शाक्यमुनी तथागत बुद्धाचा जीवनमार्ग स्वीकारून आचरणाचे महत्व अनुयायांना समजावून सांगितले. भारत देशात स्वधर्मीयांना हिंदूधर्मपुढा-यांनी हिंदूधर्म ग्रंथाच्या आधारे हिंदूचा गुलामच नव्हे तर दलित, अस्पृश्य, बहिष्कृत, दास ठरवले. या क्रुर प्रथेने त्यांच्या हजारो पिढ्या बर्बाद झाल्या. हिंदू धर्माने पशूहूनही त्याना हीन, नीच दर्जा दिला. धर्म माणसासाठी नसून माणूस धर्माकरिता हिंदू पुढाऱ्यांनी ठरवला. हे हजारो वर्षापूर्वी पासून प्रचलित असलेले हिंदू धर्माचे संस्कार डॉ. बाबासाहेबांनी त्याज्य ठरवले. देशात नव्या प्रतिक्रांतीची सुरवात झाली. नव्या आत्मोद्धाराच्या विचाराचे वारे वाहायला लागले. नव्या विचाराने जनता प्रभावित झाली. आम्ही त्या गावचे नाही हे जो तो सांगायला लागला. हे परिवर्तन आहे. याचा स्वीकार करणेही गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पक्षाचे तुकडे, आंबेडकरी विचारात अनेक गट, धम्म मार्गात अनेक नव्या वाटा नीर्माण झाल्या पण यांना डॉ. बाबासाहेबांशिवाय पर्याय नाही. डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत त्यांचे सोबत अनेक इतर होते. ते आता दिसत नाही. नवी पालवी फुटली हे ही कमी नाही. उत्तरोत्तर प्रगती वाढती आहे. ती फार वाढणार यात संशय नाही. ज्या मार्गाने डॉ. बाबासाहेबांनी धुरा वाहत आणली त्या मार्गाचा विसर करणाऱ्यांस, स्वार्थासाठी विरोध करणाऱ्यास समाजाची माफी नाही. डॉ. बाबासाहेबाच्या विचारांशी फारकत करणारे मिटले. समाजाशी प्रतारणा करणारे विरोधकांच्या ताटाखालची मांजर झाले. सांगकामे, जीवंत राहून मेल्यासारखे जगणे काय कामाचे? समाजातून ते मिटले. समाजात त्यांना मानाचे स्थान नाही. असे काटे डॉ. बाबासाहेबांच्या वेळेसही होते. ते विचारात घेण्यासारखे नाहीत. एकंदरीत आंबेडकरी समाजाची वाटचाल शिक्षण, धम्म आत्मनिर्भरतेच्या विविधांगानी होत आहे. समाजाशी एकरूप होत आहे. विरोधाभासही होत आहे. जगाला “बुद्धा” शिवाय तसे समाजाला “जयभीम” शिवाय पर्याय नाही. बुद्ध जगाचे बल स्थल तसे जयभीम समाजाचे बल स्थल झाले. हे निर्विवाद सत्य मिटवता मिटणार नाही. बिघडलेले गेले ते अंज-यात, मंज-यात नाही. त्यांचे कुत्रे मांजरीचे जगणे मरणे झाले. पण अशा समाज द्रोहीमुळे निर्बुद्धांना बळ मिळतो. समाजाने सावध राहावे. यंत्र, तंत्र मंत्राने जगतगुरू शंकराचार्यांनी धर्म टिकवला. देश गुलामीत बुडाला त्याचेही त्यांचे घेणे देणे नाही. या पदाची पात्रता ब्राम्हण असणे व ब्राम्हणांनी रचलेले ग्रंथ पाठांतर. तर्क वितर्क, राष्ट्र निर्मितीत त्यांचा वाटा नाही. अलिकडे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानी नवे संशोधन मांडले “कौण कहता है भारत देश बुद्ध के अहिंसा मार्ग से चलता है ? यह धरती विरोकी शस्त्रो की है, जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आले, भारत देश साऱ्या जगाला पोटतिडकीने सांगतो. “भारत भूमी बुद्धाची आहे. युध्दाला पर्याय केवळ बुद्ध आहे.” हे अनेक देशांनी मान्य केले. हे अविमुक्तेश्वरांना कां खटकावे ? पूर्व प्रधानमंत्र्यासारखे वर्तमान प्रधानमंत्री तिसऱ्या जागतिक महायुद्धाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगाला बुद्धाच्या अहिंसा करूणेने युद्धापासुन परावृत्त करण्यात प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहेत. युद्ध टाळण्यासाठी दुसरा पर्याय नाही. ●●

**विद्या व्यासंग**



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064

# कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व
# डॉ. सूर्यकांता पाटील-कांबळे व डॉ. चंद्रमणी कांबळे

**ध्येय निश्चित असेल, तर ते साध्य करण्यासाठी कितीही संकटे, अडथळे किंवा प्रतिकूल परिस्थिती आली तरी ध्येयवेडी व्यक्ती कधीही विचलित होत नाही. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा आणि समाजाविषयीची तळमळ या गुणांच्या बळावरच यशाची खरी उंची गाठता येते. स्वतःच्या विचारांचा आणि कृतीचा समाजावर काय परिणाम होईल, याचा विचार करणारी माणसेच समाजपरिवर्तनाची खरी शिल्पकार ठरतात. स्वतःपुरते जीवन न जगता समाजासाठी काहीतरी करण्याची धडपड, गोरगरिबांच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणण्याची तळमळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या “पे बॅक टू सोसायटी” या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करणारी व्यक्तिमत्त्वे आजच्या काळात अत्यंत दुर्मिळ आहेत. अशाच ध्येयवेड्या, कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे डॉ. चंद्रमणी कांबळे आणि डॉ. सूर्यकांता पाटील कांबळे हे दाम्पत्य होय. वैद्यकीय क्षेत्रात पंधरा ते वीस वर्षे सेवा देताना त्यांनी केवळ स्वतःचे रुग्णालय उभारण्याचे स्वप्न पाहिले नाही, तर त्या रुग्णालयासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित पॅरामेडिकल कर्मचारी समाजात निर्माण करण्याचाही संकल्प केला.**

रुग्णालय म्हणजे केवळ डॉक्टर नव्हे; तर त्यामागे रुग्णसेवेसाठी रात्रंदिवस कार्य करणारे नर्सेस, टेक्निशियन, लॅब सहाय्यक, फार्मसी कर्मचारी आणि इतर वैद्यकीय कर्मचारी यांची मोठी साखळी कार्यरत असते. ही आवश्यकता त्यांनी जवळून अनुभवली आणि त्यातूनच नॅशनल इनस्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल या संस्थेची निर्मिती झाली. आजच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यावसायिकीकरण झालेले दिसून येते. अनेक ठिकाणी डॉक्टरांकडून सामाजिक बांधिलकीपेक्षा आर्थिक फायद्याला अधिक महत्त्व दिले जाते. मात्र डॉ. चंद्रमणी कांबळे आणि डॉ. सूर्यकांता पाटील कांबळे हे दाम्पत्य याला अपवाद ठरते. वैद्यकीय सेवा, सामाजिक कार्य आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो. त्यांनी सुरू केलेली संस्था ही केवळ शिक्षणसंस्था नसून हजारो गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरली आहे. दैनिक बहुजन सौरभच्या वतीने या दाम्पत्याशी संवाद साधण्याची संधी लाभली. त्यांच्या जीवनप्रवासाविषयी, संघर्षाविषयी, सामाजिक बांधिलकीविषयी आणि नॅशनल इनस्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकलच्या स्थापनेमागील उद्देशाविषयी त्यांनी अत्यंत मनमोकळेपणाने माहिती दिली. संवादाच्या सुरुवातीला डॉ. सूर्यकांता पाटील कांबळे यांनी आपल्या बालपणाच्या आठवणी सांगितल्या. त्या म्हणाल्या, “माझा जन्म वर्धा जिल्ह्यातील धोत्रा रेल्वे या छोट्याशा गावात झाला. माझे वडील बांधकाम विभागात चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. आमचे कुटुंब अत्यंत साधे आणि कष्टकरी होते. आम्ही लहान असतानाच वडिलांच्या नोकरीनिमित्त संपूर्ण कुटुंब वर्धा येथे स्थायिक झाले. आर्थिक परिस्थिती मर्यादित असली तरी शिक्षणाची ओढ आणि प्रगतीची जिद्द आमच्या कुटुंबात होती. माझे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण वर्ध्यातील नामांकित शाळा आणि महाविद्यालयांत झाले.” त्या पुढे म्हणाल्या, “लहानपणापासूनच मला समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. लोकांची सेवा करावी, गरजूंच्या मदतीला धावून जावे, अशी भावना मनात होती. त्यामुळेच मी वैद्यकीय क्षेत्राची निवड केली. १९९७-९८ मध्ये नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातून बी.ए.एम.एस. पदवी पूर्ण केली. त्यानंतर सेवाग्राम येथील एम.जी.आय.एम.एस.मध्ये आयुर्वेद विभाग आणि मानसिक रोग विभागात असिस्टंट मेडिकल ऑफिसर म्हणून चार वर्षे कार्य केले. तसेच वर्ध्यातील प्रसिद्ध जाजू हॉस्पिटलमध्ये सहाय्यक डॉक्टर म्हणूनही काम केले. विवाहानंतर मी एमबीए आणि मानसशास्त्र विषयात एम.ए. पदवी संपादन केली.” सन २००४ मध्ये त्यांचा विवाह डॉ. चंद्रमणी कांबळे यांच्याशी झाला. विवाहानंतर दोघांनी मिळून समाजोपयोगी कार्य करण्याचे स्वप्न पाहिले. या स्वप्नाला प्रत्यक्षात उतरवत त्यांनी भंडारा जिल्ह्यातील जवाहरनगर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रामीण रुग्णालयाची स्थापना केली. ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू रुग्णांना अत्यल्प खर्चात उपचार मिळावेत, हा त्यामागील मुख्य उद्देश होता. रुग्णांची केवळ पाच रुपयांत नोंदणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून देण्याची योजना त्यांनी राबविली. या सेवेमुळे अनेक गरीब कुटुंबांना मोठा आधार मिळाला. रुग्णालय सुरू केल्यानंतर त्यांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली— प्रशिक्षित पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची कमतरता. डॉक्टर असूनही योग्य टेक्निशियन, नर्सेस आणि सहाय्यक कर्मचारी उपलब्ध नसतील, तर रुग्णालयाची सेवा अपुरी पडते. अनेक वेळा कुशल मनुष्यबळाअभावी रुग्णांना आवश्यक सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत होत्या. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी त्यांनी स्वतःची पॅरामेडिकल संस्था सुरू करण्याचा निर्णय घेतला. डॉ. सूर्यकांता पाटील कांबळे सांगतात, “डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आम्हाला सतत प्रेरणा दिली. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश आमच्या कार्याचा आधार बनला. समाजाने आम्हाला खूप काही दिले आहे; त्यामुळे समाजासाठी काहीतरी करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे आम्हाला वाटत होते. त्यातूनच नॅशनल इनस्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकलची स्थापना झाली.” संस्थेच्या सुरुवातीच्या काळात अनेक अडचणी आल्या. आर्थिक मर्यादा, प्रशासकीय अडथळे, जागेची कमतरता आणि सामाजिक आव्हाने यांचा सामना करावा लागला. मात्र ध्येय निश्चित असल्यामुळे त्यांनी कधीही हार मानली नाही. सुरुवातीच्या काळात दोघेही स्वतः विद्यार्थ्यांना शिकवत असत. विविध अभ्यासक्रमांचे अध्यापन, प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षण ते स्वतः देत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. संस्थेत आज विविध डिप्लोमा आणि पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. डी.एम.एल.टी., रेडिओलॉजी, डायलिसिस टेक्निशियन, ओटी टेक्निशियन, ऑप्टोमेट्री, ईसीजी टेक्निशियन, फिजिओथेरपी आणि फार्मसी असिस्टंट यांसारखे रोजगाराभिमुख डिप्लोमा अभ्यासक्रम येथे शिकविले जातात. तसेच बी.एन.वाय.एस., बी.पी.टी., बी.एस्सी. एम.एल.टी., बी.एस्सी. रेडिओ इमेजिंग टेक्नॉलॉजी, ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी, डाएट अँड न्यूट्रिशन यांसारखे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमदेखील उपलब्ध आहेत. डिप्लोमा अभ्यासक्रमांसाठी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात; तर पदवी अभ्यासक्रमांसाठी विज्ञान शाखेची अर्हता आवश्यक आहे. विशेष म्हणजे इतर संस्थांच्या तुलनेत येथे अत्यंत माफक शुल्क आकारले जाते. सर्वसामान्य, मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनाही हे शिक्षण सहज परवडावे, यासाठी संस्थेने अत्यल्प शुल्क धोरण स्वीकारले आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सुविधाही उपलब्ध करून दिली जाते. संस्थेत सुसज्ज वर्गखोल्या, प्रयोगशाळा, अनुभवी शिक्षक, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि अत्याधुनिक शिक्षणपद्धती उपलब्ध आहेत. काही विद्यार्थी वैयक्तिक कारणांमुळे प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहू शकत नसल्याने ऑनलाईन वर्गांची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा यासाठी प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांवर विशेष भर दिला जातो. कोर्स पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध नामांकित रुग्णालयांमध्ये इंटर्नशिप आणि प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. तायवाडे हॉस्पिटल, सेव्हन स्टार हॉस्पिटल, स्वास्थ्यम हॉस्पिटल यांसारख्या अनेक रुग्णालयांशी संस्थेचे सामंजस्य करार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. डॉ. चंद्रमणी कांबळे सांगतात, “आजच्या काळात मोठमोठ्या पदव्या घेऊनही अनेक युवक बेरोजगार आहेत. अशा परिस्थितीत पॅरामेडिकल शिक्षण हे रोजगाराभिमुख शिक्षण ठरत आहे. कोणताही पॅरामेडिकल अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी बेरोजगार राहत नाही. विशेषतः दहावी-बारावीत कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी हे क्षेत्र मोठी संधी निर्माण करते. अनेक विद्यार्थ्यांना पुढे काय करावे हे समजत नाही. अशा विद्यार्थ्यांना आम्ही योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रशिक्षण देतो.” ते पुढे म्हणाले, “आजपर्यंत आमच्या संस्थेतून शिक्षण घेतलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी व्हावे, बेरोजगारीतून मुक्त व्हावे आणि आपल्या कुटुंबाला आधार द्यावा, हाच आमच्या कार्यामागील खरा हेतू आहे. आमच्या कार्यातून बेरोजगारी कमी व्हावी आणि देशाच्या प्रगतीत हातभार लागावा, हीच आमची इच्छा आहे.” कुटुंबाविषयी बोलताना डॉ. सूर्यकांता पाटील कांबळे यांनी सांगितले की, त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. त्यांचा मुलगा बायोमेडिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असून मुलगी सीबीएसई दहावीच्या परीक्षेत ९५.५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. आपल्या मुलांनाही त्यांनी उत्तम संस्कार आणि शिक्षण दिले असून कुटुंब, व्यवसाय आणि सामाजिक कार्य यांचा समतोल यशस्वीपणे साधला आहे. संवादाच्या शेवटी बहुजन सौरभच्या प्रतिनिधी ज्योत्स्ना बनसोड यांनी या दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले, “तुमच्या कार्यातून संघर्ष, प्रामाणिकपणा, समाजाविषयीची निष्ठा आणि सेवाभाव स्पष्टपणे दिसून येतो. तुम्ही केवळ व्यवसायाने डॉक्टर नसून संवेदनशील सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षण क्षेत्रात समाजहितासाठी कार्य करणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहात. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य तुम्ही सातत्याने करत आहात, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. तुमच्या संस्थेतून घडणारे विद्यार्थी समाजात यशस्वी होवोत आणि संस्थेचा लौकिक अधिक वृद्धिंगत होवो, हीच सदिच्छा.”लेख व्याकरणदृष्ट्या, शैलीदृष्ट्या आणि वृत्तपत्रीय भाषेच्या दृष्टीने संपादित केला आहे. तसेच शब्दलेखन, विरामचिन्हे, वाक्यरचना आणि आशयाची सलगता सुधारण्यात आली आहे. ●●





ज्योत्स्ना बनसोड
8766942982

“ तुमच्या विचारांवर तुमचे भविष्य अवलंबून असते, म्हणूनच नेहमी सकारात्मक विचार करा... ”



# प्रा. कुमुदताई पावडे यांना आदरांजली
## अंतःस्फोटातून व्यक्त झालेला विद्रोहाचा स्वर..




प्रा. कुमुदताई पावडे यांना आदरांजली वाहताना त्यांचे 'अंतःस्फोट' हे आत्मचरित्र अनिवार्यपणे स्मरणात येते. दलित साहित्य, स्त्रीवादी विचार आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. दलित विद्रोही साहित्याच्या प्रवाहात जनाबाई गिर्हे, शांताबाई कांबळे, बेबीताई कांबळे, उर्मिला पवार, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे अशा अनेक लेखिकांनी आपल्या लेखनातून चळवळीला बळ दिले. या परंपरेत प्रा. कुमुदताई पावडे यांचे स्थान विशेष अधोरेखित होते. 'अंतःस्फोट₹ म्हणजे अंतर्मनातील उद्रेक. या आत्मचरित्रातून कुमुदताईंनी आपल्या आयुष्यातील संघर्ष, वेदना, अपमान आणि प्रतिकार यांचे अत्यंत संयत पण प्रभावी चित्रण केले आहे. 'अंतःस्फोट' या एकाच ग्रंथाने त्यांना मराठी साहित्यविश्वात वेगळी आणि कायमस्वरूपी ओळख प्राप्त करून दिली. कुमुद ताईंचे हे आत्मचरित्र केवळ वैयक्तिक अभवांचे कथन नसून दलित स्त्रीच्या अस्तित्वलढ्याचा ऐतिहासिक दस्तावेज आहे. कुमुदताईंचा ठाम विश्वास होता की, ज्ञान ही कुणाची जहागीरदारी नसून ते धैर्य, परिश्रम आणि जिद्दीने संपादन करावे लागते. स्त्रियांचा सक्रिय सहभाग नसलेली कोणतीही सामाजिक चळवळ व्यापक परिवर्तन घडवू शकत नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. शिक्षण आणि राजकारणात स्त्रियांनी प्रगती केली असली तरी समाजसुधारणेच्या कामात त्यांचा सहभाग अपेक्षेइतका दिसत नाही, याची त्यांना खंत होती. कुटुंब, धर्म आणि समाजाच्या भीतीमुळे स्त्री अनेकदा सत्याच्या बाजूने उभी राहत नाही, असे त्या म्हणत. अभिनया कांबळे यांनी कुमुदताईंबद्दल लिहिताना इटालियन विचारवंत अँटोनियो ग्राम्सी यांच्या ₹ऑर्गॅनिक इंटलेक्च्युअल₹ या संकल्पनेचा उल्लेख केला आहे. एखाद्या समाजघटकातून उभा राहून त्याच समाजाच्या प्रश्नांना वैचारिक दिशा देणारा बुद्धिजीवी म्हणजे ऑर्गॅनिक इंटलेक्च्युअल. दलित स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडत त्यांच्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या कुमुदताई या या संकल्पनेचे उत्कृष्ट उदाहरण ठरतात. नोकरी, शिक्षण, विवाह आणि सामाजिक स्वीकार या प्रत्येक पातळीवर त्यांना संघर्ष करावा लागला. त्या संघर्षातूनच 'अंतःस्फोट' जन्माला आला. स्त्री ही सर्वप्रथम माणूस आहे आणि तिचा विचार माणूस म्हणून व्हायला हवा, हा बुद्धतत्त्वज्ञानाचा विचार त्यांनी सातत्याने मांडला. शिवाजी महाराजांनी मावळ्यांच्या हातात तलवार दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांच्या हातात लेखणी दिली, असे सांगत त्या लेखणीचा उपयोग केवळ स्वतःच्या वेदना मांडण्यासाठी नव्हे तर वंचितांच्या दुःखाला शब्द देण्यासाठी व्हावा, असे आवाहन करतात. 'अंतःस्फोट' मधील पंधरा लेखांमधून त्यांचा विद्रोही आणि चिकित्सक दृष्टिकोन स्पष्ट होतो. 'आणि सावित्री व्रताची अशी सांगता होते' या लेखात त्यांनी पतीने दुसरे लग्न केलेल्या स्त्रीनेही वटसावित्रीचे व्रत का करावे, असा मूलभूत प्रश्न उपस्थित करून दांभिक परंपरांवर प्रहार केला आहे. 'मला अहेव मरण नकोच' या लेखात त्यांनी पतीवियोगानंतर स्त्री अमंगळ ठरते, या कल्पनेचा निषेध करत विवाहातील समता आणि मैत्रीचे नाते अधोरेखित केले आहे. 'मा निषाद' या लेखात त्यांनी समाजातील दांभिकतेवर कठोर टीका केली आहे. पक्षी, प्राणी यांच्यावर प्रेम करणारा समाज भुकेल्या माणसाकडे मात्र दुर्लक्ष करतो, या विसंगतीबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. 'आम्ही तर बोलून चालून स्त्रियाच' या लेखात त्यांनी स्त्री संघटनांच्या मर्यादा दाखवून देत प्रत्यक्ष कृतीची गरज अधोरेखित केली. आंतरजातीय विवाह हा जातिव्यवस्था मोडण्याचा प्रभावी मार्ग आहे, या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी एकनिष्ठ राहून कुमुदताईंनी स्वतः आंतरजातीय विवाह केला आणि पुढे सुमारे ४५० हून अधिक आंतरजातीय विवाह घडवून आणले. 'बंधनांच्या पलीकडे' या लेखातून हा सामाजिक संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. कुमुद ताईंचे कार्य राष्ट्रीय पातळीपुरते मर्यादित राहिले नाही. हरारे (झिम्बाब्वे), त्रिनिदाद आणि टोबॅगो, चीन, दक्षिण आफ्रिका, न्यूयॉर्क आणि नैरोबी येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होत त्यांनी दलित स्त्रियांचे प्रश्न जागतिक विचारपीठावर मांडले. यासाठी आवश्यक असलेले धैर्य, स्वाभिमान आणि बांधिलकी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या इतर लेखनातूनही त्यांचा चिकित्सक दृष्टिकोन दिसून येतो. 'जेव्हा श्लोक शोकाला प्राप्त होतो' या लेखात त्यांनी धर्मग्रंथांतील विसंगतींवर भाष्य केले, तर 'स्त्री शक्ती : काही विचार₹ मध्ये स्त्री शारीरिकदृष्ट्याही हीन आहे हा गैरसमज त्यांनी ठामपणे फेटाळून लावला. स्त्रीच्या शक्तीचा आणि तिच्या मानवी अस्तित्वाचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. प्रा. कुमुदताई पावडे या केवळ लेखिका नव्हत्या, त्या विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्या, प्रबोधनकार आणि परिवर्तनाच्या चळवळीतील एक लढाऊ व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांच्या लेखणीने दलित स्त्रीच्या वेदनांना शब्द दिले, तर त्यांच्या कृतीने त्या वेदनांविरुद्ध संघर्ष करण्याची दिशा दिली. 'अंतःस्फोट' हा केवळ आत्मचरित्रग्रंथ नसून तो अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा सामाजिक दस्तावेज आहे. कुमुदताई पावडे यांचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी संस्कृत विषयात प्राविण्य मिळवून जातिव्यवस्थेच्या ज्ञानमक्तेदारीलाच आव्हान दिले. शतकानुशतके ज्यांना संस्कृत शिकण्याचा अधिकार नाकारला गेला, त्या समाजातील एक स्त्री संस्कृतची प्राध्यापिका झाली, ही घटना स्वतःमध्ये सामाजिक विद्रोहाची घोषणा होती. त्यामुळे त्यांचा संघर्ष केवळ वैयक्तिक नव्हता, तर तो ज्ञानावरच्या वर्णाधारित वर्चस्वाविरुद्धचा संघर्ष होता. प्राध्यापिका म्हणून कुमुदताईंचे योगदान महत्त्वाचे आहे. शिक्षणाला त्यांनी केवळ नोकरीचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम मानले. विद्यार्थ्यांमध्ये विवेक, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. 'अंतःस्फोट' हे केवळ आत्मचरित्र नाही तर दलित स्त्रीच्या आत्मभानाचा आणि स्वत्वशोधाचा दस्तावेज आहे. या आत्मकथनात व्यक्तीगत अनुभवांमधून जात, लिंग, धर्म आणि सत्तासंबंध यांचे सूक्ष्म विश्लेषण दिसते. त्यामुळे हे पुस्तक दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि आत्मचरित्रपर साहित्य या तिन्ही क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संदेशाचे मूर्त रूप कुमुदताईंच्या आयुष्यात दिसते. त्यांनी शिक्षणातून स्वाभिमान मिळवला, समाजाशी नाळ जपली आणि लेखणीच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध संघर्ष उभा केला. कुमुदताई पावडे यांच्या लेखनातून दलित स्त्रीवादाची स्वतंत्र जाणीव प्रकर्षाने दिसून येते. त्यांनी दाखवून दिले की, दलित स्त्रीला एकाच वेळी जातीय आणि लैंगिक अशा दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तिच्या प्रश्नांची मांडणी मुख्य प्रवाहातील स्त्रीवादापेक्षा वेगळी आहे. त्यांच्या लेखनात ही जाणीव सातत्याने व्यक्त होताना दिसते. एकूणच कुमुदताईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी धर्म, परंपरा, रूढी आणि सामाजिक संकेत यांना चिकित्सक नजरेने पाहिले. त्यांनी केवळ टीका केली नाही, तर त्या परंपरांमुळे स्त्री आणि वंचित समाजावर होणाऱ्या परिणामांचा वेध घेतला. त्यामुळे त्यांचे लेखन विद्रोही असले तरी ते विवेकनिष्ठ आणि परिवर्तनवादी आहे. 'अंतःस्फोट' वाचताना जाणवते की, कुमुदताईंनी स्वतःच्या आयुष्यातील वेदना, अपमान, असुरक्षितता आणि संघर्ष यांना कुठलाही मुलामा दिलेला नाही. हा प्रामाणिकपणा त्यांच्या आत्मकथनाला विश्वासार्हता आणि साहित्यिक ताकद प्रदान करतो. अनेक विचारवंतांचे विचार केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहतात. मात्र कुमुदताईंच्या बाबतीत विचार आणि कृती यांच्यातील सुसंगती विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी जे लिहिले ते जगल्या आणि जे जगल्या तेच लिहिले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी ठरते. आजही जात, लिंगभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत कुमुदताई पावडे यांचे लेखन आणि विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. समता, स्वाभिमान, शिक्षण आणि विवेक यांच्या मूल्यांची आठवण करून देणारा त्यांचा वारसा आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. प्रा. कुमुदताई पावडे या विद्रोह, विवेक आणि स्वाभिमान यांचे प्रतीक होत्या. त्यांनी उभी केलेली विचारांची मशाल आजही समतेच्या वाटचालीला प्रकाश देत आहे. त्यांच्या लेखनातून आणि कार्यातून पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील. त्या महान विदुषीला विनम्र अभिवादन. ●●

डॉ. प्रगती सुभाष
मो. 9921628409

# किरदार

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

वडीलांचे आजारपण, बहीणीचे लग्न, सततची नापीकी, मुलांचे शिक्षण, वाढती महागाई, शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव. ईत्यादी अनेक कारणांमुळे त्या सुखवस्तु कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली होती. वाढत्या महागाईमुळे घर कसे चालवायचे हा मोठा प्रश्नच होता. डोक्यावर कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला होता. चाणाक्ष सावकार आणि मतलबी नातेवाईकांना जेव्हा याची जाणीव झाली तेव्हा सावकार आपल्या पैशासाठी तगादा लावत होते. नातेवाईकांनी परिस्थिती बघुन पाठ फिरवली होती. ज्यांना कठीण काळात मदत केली ते देखील विसरले होते. हतबल होऊन तो त्याच्या पत्नीला म्हणाला की, एक सुंदर गोष्ट माझ्या वाचनात आली. आपलीही परिस्थिती तशीच आहे. 'करीबी और ग़रीबी का सिखाया हुआ सबक, इंसान को अंदर से बदलने को मजबूर कर देता है 'हे बघ! काही कारणाने नाराजी असली तर आपण समजू शकतो. पण गरीबीमुळे लोक संबंध तोडतात हा ही अनुभव येत आहे. नाराजी नात्यातला एक भाग आहे पण मौन किंवा अबोला हा नात्यांचा अंत आहे. जे लोक भरभरून बोलायचे आज त्यांचे मौन हे सांगते की जर संवाद साधला तर कदाचित आपण त्यांना काही मदत मागु शकतो. म्हणूनच ते सोईस्करपणे दुर गेले आहेत.खरंच गरीबी फार वाईट. आता आजवर आपण केलेल्या हजारो चांगल्या कामांची कुणी पावती देत नाहीत. पण एखाद्या क्षुल्लक चुकीचा हिशोब मात्र ठेवला जातो. जर माणसाचे ईमान शाबूत असेल तर वेळेवर पाजल्या गेलेल्या घोटभर पाण्याची आठवण माणूस आयुष्यभर विसरत नाही पण या स्वार्थी जगात कुणी आपले काळीज काढून दिले तरी कुणी उपकार मानत नाही. याची जाणीव प्रतिकूल परिस्थितीत होते. काही मंडळींना वाटते की, मी लाचारी पत्करून त्यांच्या पायाशी लोळण घ्यावे. तत्वाशी नको ती तडजोड करावी. आपल्या कठीण परिस्थितीतीचा गैरफायदा घेण्यासाठी कित्तेक लोक टपलेले आहेत. पण मला खात्री आहे की, प्रामाणिकपणे वाटचाल करीत राहीले तर हेही दिवस पालटून जातील. मैं झुक तो जाऊँ, मुझे पता है, मसला हल हो जाएगा, मगर इससे मेरे किरदार का कत्ल हो जाएगा.●●

बहुजन सौरभ

# भारताची फाळणी हे रा.स्व.संघाचे कारस्थान




हिंदू महासभेची स्थापना 1915 साली झाली आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना 1925 साली झाली या दोन ब्राह्मणी विचारधारेच्या संघटनांनी अखंड हिंदुस्थानाचे विभाजन घडवून आणले आणि आज हेच लोक भारतीय जनतेला पुन्हा अखंड भारताचे स्वप्न दाखवून परत एकदा मूर्ख बनवत आहेत.हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन्ही ब्राह्मणी संघटनाची विचारधारा ही भारत हे हिंदूराष्ट्र म्हणजेच ब्राह्मणराष्ट्र असावे ही आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळावे या आंदोलनात हिंदू आणि मुस्लिम हे दोन्ही समाज बरोबरीने कार्यरत होते. पण ह्या देशाला जर स्वातंत्र्य मिळाले तर या देशाचे नेतृत्व कोणत्या समाजाकडे राहील ह्या चिंतेने ब्राह्मण समाजाला ग्रासले होते मुसलमान जर याच देशात राहिले तर या देशाला ते ब्राह्मणराष्ट्र म्हणजेच हिंदू राष्ट्र बनू देणार नाहीत याची ब्राह्मण समाजाला खात्री होती कारण मुसलमान हे हिंदू धर्माच्या कक्षेत येत नाही म्हणून त्यांना मनुस्मृतीचे कायदे लागू होत नाही. हिंदूराष्ट्र म्हणजेच ब्राह्मणराष्ट्र बनवण्याच्या मार्गात मुसलमान हे मुख्य अडथडा आहेत हे ओळखून संपूर्ण मुसलमान समाजाविरोधात पराकोटीचा विद्वेश पसरवायचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आणि हिंदू महासभेने केले आणि जागोजागी हिंदू -मुसलमान दंगली घडवून आणल्या. व अशा वातावरणाची निर्मिती केली की या देशात हिंदू ,मुसलमान हे एकत्र राहूच शकत नाही. याचा परिणाम असा झाला की शेवटी भारताचे दोन तुकडे झाले व मुसलमानांना भारताच्या बाहेर जावे लागले.आज अखंड भारत एकसंघ असता तर या देशात आज मुस्लिमांची संख्या 40% असती अशावेळी 40% मुस्लिम व 15 % शेड्युल कास्ट अधिक ओबीसी मिळून या देशाची राजकीय सत्ता या मागासवर्गीय वर्गाच्या ताब्यात असती, व या देशात ब्राम्हणांची मुजोरी व मनुस्मृतीचे कायदे चालले नसते. म्हणून ब्राह्मणवर्गाने पद्धतशीरपणे तत्कालीन हिंदुस्तानचे दोन तुकडे केले त्याचा परिणाम आज भारताची संपूर्ण सत्ता ब्राह्मणांच्या ताब्यात गेलेली आहे. हे सत्य आहे. ब्राम्हणांची कूटनीती ही दीर्घकालीन असते म्हणून ती सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात येत नाही.●●



प्रमोद मून
मो.94230 63127

# ऐतिहासिक दृष्टया गधेळाचे महत्व

**प्रजेचा प्रतिपाळ करणाऱ्या राजाची आज्ञा प्रजेने मोडली तर गय केली जाणार नाही, हे दर्शवीप्या साठी गधेगळ कोरले जात असत. गधेगळ हे दानपत्र होते. शिलाहार राजांच्या काळात चालु झालेली ही दानपत्र कोरण्याची प्रथा पुढे यादवांची राजवट ते इस्लामी राजवटी पर्यंत चालु होती.**




साधारणपणे सन ९०० ते सन १६००) महाराष्ट्रात आढळणाऱ्या गधेगळावरील शिलालेख( दानपत्र) संस्कृत आणि मराठी भाषेत कोरलेले आढळतात. गधेगळ हा दगड अयताकृती असुन त्याचे ढोबळमानाने तीन भाग होतात. सर्वात वरच्या बाजुस सुर्य - चंद्र आणी त्यामध्ये कलश कोरलेला असतो. हि चिन्ह दान देणाऱ्या राजाची किर्ती आसमंतात सूर्य - चंद्र असे पर्यंत कायम राहील हे . दर्शवीनारी आसतात. मधल्या भागात दानपत्र व धमकी कोरलेली असते. दानत्रात जमीन कोणाला दान केली? कधी दान केली? कोणत्या राजच्या कारकिर्दित दान केली? आणि दान केलेल्या जमीनीच्या सीमा यांचा उल्लेख असतो. सर्वात खालच्या बाजुला गाढव किंवा घोडा स्त्रिशी संभोग करताना दाखवीलेले असते. दिलेल्या दानाचे दुर उपयोग केल्यास नियम मोडल्यास काय शिक्षा हे सांगणारी ही शीलपांकीत केलेली धमको/ शिवी असते.

एखाद्या व्यक्तीने जर गधेगळा वर लिहलेला मजकुराचे पालन केले नाही अथवा त्याला विरोध केला तर त्याच्या घरातील स्त्रि सोबत अशारीतीने बळजबरी केली जाईल. अशा या शिल्पा चा अर्थ आहे. त्यामुळे घाबरून कोणी ही राजाज्ञा मोडणार नाही अशी या मागील कल्पना असावी. मौजेः मालाडे पो. रामराज ता. आलिबाग. आलिबाग रोहा रोड वरील छोटेसे मालाडे गाव असुन त्याला ५०० ते ८०० वर्षाची ऐतिहासिक पार्शभुमी आहे.मालाडे येथे गधेगळ असुन जवळच गावात प्राचिन धावीर मंदीर आहे. या ठिकाणाला गाढवाची पाखर देखील म्हणतात या जागेवर खाजवी अतिक्रमण होऊण गधेगळ नष्ट होण्याच्या बेतात आहे. तरी जिल्हा प्रशासन पुरातत्व विभाग यांनी लक्ष घलावे. मौजेः उमटे( रामराज) ता. अलिबाग येथे गधेगळ असुन ते पाच भागत आहे. बहुतेक गधेगळ हे चार भागात आहे. जवळच सतीगळ असुन ती मातीत रुतलेली आहे. पुढे दोन खारा पाणी असलेल्या ऊजाड विहीरी आहेत. तेथुन पुढे गेल्या वर जांभा दगडाचा नंदी व शंकराची पिंड आहे. हे शिल्प पावसाने क्षरण झाले आहे. माहार सामाजाचे ते पुजा करण्याचे छोटेसे स्थान होते. हि सपुर्ण माहीती ब्रिटीशांनी घेतली नसावी तरी प्रथमच माहीती प्रसिद्ध होत आहे. ●●

संतोष बाबु शिंदे
मो.9860218733

# हिंदुत्व ते हिंदुराष्ट्र




एका वृत्तपत्रामध्ये बातमी प्रकाशित झाली जगात 55 च्या वर मुस्लिम राष्ट्र,सातच्या वर बौद्ध राष्ट्र आहेत परंतु हिंदूचे एकही हक्काचे राष्ट्र नाही यासारखी मोठी शोकांतिका नाही असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते व वक्ते शरद पोक्षे यांनी केले.श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टच्या वतीने स्वतंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 143 व्या जयंती निमित्त आयोजित अंदमान एक तीर्थक्षेत्र या त्रिदिवषीय महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ते हिंदुत्व या विषयावर बोलत होते अध्यक्षस्थानी ट्रस्टचे अध्यक्ष श्री संदीप जोशी होते. पोक्षे बोलताना हिंदू मध्ये सुंदर वर्णव्यवस्था होती असेही म्हणतात,वर्णव्यवस्थेत चार वर्ण होते ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारही वर्णाची रचना व कार्यपद्धती निश्चित केलेली होती ब्राम्हणाने पूजा पाठ,शिक्षण ग्रहण करावे,क्षत्रियांनी सैनिक व राजा बनावे. वैश्याने व्यापार करावा तर शूद्र वर्णाने वरच्या तिन्ही वर्णाची सेवा करावी. ब्राह्मणांना विशेष अधिकार होते जे इतरांना नाकारण्यात आले होते पूजा विधी वेदपठण उच्चारण,शिक्षण सर्व शुद्रांना नाकारले होते जर संघ आणि त्यांच्या शाखा वर्णव्यवस्थेचे समर्थन करत असतील तर त्यांना असे हिंदू राष्ट्र निर्माण करायचे आहे हे निश्चित. हे करतांना वर्ण व्यवस्थेनुसार ब्राह्मणांना राजकारणातून संन्यास घ्यावा लागेल व राजपाट क्षत्रियांकडे सोपवावा लागेल,हिंदू विचारधारेनुसार स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे पाप,स्त्रिया शिकल्यानंतर तिचा पतिमृत होतो असे समजायचे,हिंदू राष्ट्र झाल्यास स्त्रियांचे शिक्षण बंद करावे लागेल स्त्रियांना मासिक पाळी येत असल्याने त्या अपवित्र असतात त्यामुळे शिक्षणासारखे पवित्र कार्य करणाऱ्या स्त्री शिक्षकांची नियुक्ती करणे थांबवावे लागेल, डॉक्टर आंबेडकर कायदेमंत्री असताना हिंदू महिलांना न्याय मिळावा म्हणून हिंदू कोड बिल तयार केले होते ज्यामुळे घटस्फोटाची परवानगी,जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य, वडिलोपार्जित प्रॉपर्टी मध्ये वाटा,स्वतःच्या प्रॉपर्टीची विल्हेवाट व संरक्षण करण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते त्याला जरी त्या काळात विरोध झालेला असला तरी कालांतराने हिंदू कोड बिलातील तरतुदींना मान्यता मिळत गेली समाजाने,शासनाने ते स्वीकारले परंतु स्त्री विषयीची भावना बदलली नाही. मोदी शासन काळात नवीन संसद भवनाचे उद्घाटन प्रसंगी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू विधवा असल्याने आदिवासी महिला असल्यामुळे त्यांना बोलावले गेले नाही अयोध्येच्या राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला सुद्धा त्यांना बोलावले नाही, मोदीजी सोनिया गांधी यांना जर्सी गाय म्हणायचे काँग्रेसची विधवा म्हणून अवहेलना करायचे,अपमान करायचे असेच हिंदू राष्ट्र निर्माण होणार असेल तर काय या देशाचे भविष्य सुरक्षित समजावे? त्यांनी खुशाल हिंदू राष्ट्र निर्माण करावे पण त्याआधी परत देशाची फाडणी करून बौध्द, शीख, जैन यांच्यासाठी दुसऱ्या राष्ट्राची निर्मिती करावी आम्ही भारतीय संविधानाने राष्ट्र चालवू तर त्यांनी मनुस्मुर्ती प्रमाणे राष्ट्र घडवावे.●●

प्रा डॉ.राजेंद्र कांबळे
मो.9272123066

# संघर्षशील व्यक्तिमत्त्वाचा प्रवास
## ॲड. लखनसिंह कटरे यांच्या प्रेरणादायी प्रवासाची कहाणी

**जिवनात यश मिळविण्यासाठी केवळ प्रतिभा पुरेशी नसते; त्यासाठी संघर्षाची तयारी, तत्त्वनिष्ठा, कुटुंबाचे पाठबळ आणि संकटांशी दोन हात करण्याची जिद्द आवश्यक असते. अशा गुणांचा संगम ज्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.**




त्या ॲड. लखनसिंह कटरे यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले तर तो एका संघर्षशील, तत्त्वनिष्ठ आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचा प्रेरणादायी आलेख वाटतो. या प्रवासात त्यांना खंबीर साथ लाभली ती त्यांच्या सहचारिणी सौ. उषादेवी कटरे यांची. २ जून १९८२ रोजी लखनसिंह कटरे आणि उषादेवी तुरकर यांचा विवाह झाला. दोन सुसंस्कृत आणि समृद्ध विचारांच्या घराण्यांचे हे मिलन होते. सौ. उषादेवी या छत्तीसगडमधील इंग्रजकालीन डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर रायबहादूर स्व. टुंडीलाल पोवार तुरकर यांच्या नात आणि स्व. यदुराजसिंह तुरकर यांच्या कन्या आहेत. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या घराण्याचे संस्कार आणि शिक्षणाचा ठेवा त्यांना लाभला. बी.ए.मध्ये तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, हिंदी आणि संस्कृत या विषयांचे शिक्षण घेतलेल्या उषादेवींनी संसार आणि कुटुंब यांनाच आपल्या कार्यक्षेत्राचे केंद्र मानले. दुसरीकडे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या लखनसिंह कटरे यांनी सहकार विभागात जिल्हा उपनिबंधक म्हणून अत्यंत प्रामाणिक आणि निर्भीड सेवा बजावली. शासनसेवेत असताना त्यांनी अनेक कठीण परिस्थितींना तोंड दिले. तत्त्वांशी तडजोड करण्याऐवजी त्यांनी नेहमीच सचोटीचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे त्यांना वारंवार बदल्यांना सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेपासून कधीही माघार घेतली नाही.

२००६-०७ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील बोदेगाव येथील आठ वर्षांपासून बंद पडलेला 'जयकिसान साखर कारखाना' पुन्हा सुरू करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. वारणा समूहाच्या सहकार्याने हा कारखाना ११० टक्के क्षमतेने सुरू करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच काळात शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्नही उल्लेखनीय ठरले. एका प्रभावशाली मंत्र्यांच्या अनधिकृत आदेशाला नकार देत त्यांनी स्वतःहून गडचिरोली येथे बदली स्वीकारली; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. हीच त्यांची खरी ओळख ठरली.

प्रशासकीय सेवेत अनेक वादळे आली, परंतु त्या प्रत्येक संकटात सौ. उषादेवी कटरे यांनी संसाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पतीच्या प्रामाणिकपणाचा त्यांना अभिमान होता. त्यामुळे संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी त्यांच्या पाठीशी उभे राहून मानसिक बळ दिले. या परस्पर विश्वासामुळेच त्यांच्या सहजीवनाची वीण अधिकाधिक घट्ट होत गेली.

२०१३ मध्ये शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर कटरे दाम्पत्याने आपल्या मूळ गावी परतण्याचा निर्णय घेतला. निवृत्तीनंतरही त्यांनी विश्रांती न निवडता समाजोपयोगी आणि सर्जनशील कार्याला वाहून घेतले. सौ. उषादेवींनी आपल्या वडिलांचा आणि आजोबांचा कृषी वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला. गोंदिया जिल्ह्यातील बोरकन्हार येथे त्यांनी स्वतःच्या शेतात साठहून अधिक विविध जातींच्या आंब्यांची लागवड करून एक सुंदर आमराई विकसित केली. आज ही आमराई त्यांच्या परिश्रमांची साक्ष देत बहरलेली आहे. लखनसिंह कटरे यांनी साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांचे १९ ग्रंथ प्रकाशित झाले असून आणखी सात ग्रंथ प्रकाशनाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांच्या 'जाणिवेतले कर्कदंश' या कवितासंग्रहातील 'जागर' ही कविता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. 'शाश्वत मौनाचे स्वगत' या अभंगसंग्रहामुळे आधुनिक मराठी अभंग परंपरेतील महत्त्वाचे रचनाकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

साहित्य, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी सदस्य, साहित्य अकादमीच्या मराठी भाषा सल्लागार समितीचे सदस्य, अखिल भारतीय साहित्य परिषदेचे विदर्भ प्रांताध्यक्ष तसेच विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांशी सक्रियपणे जोडलेले आहेत. २००७-०८ मध्ये यवतमाळ येथे तिसऱ्या अखिल भारतीय बोली साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन त्यांनी केले होते. त्यांच्या जीवनातील सर्वात कठीण काळ २०१० मध्ये आला. किडनीच्या कर्करोगाने त्यांना ग्रासले. आजाराच्या उपचारांदरम्यान त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर झाली होती. मात्र या संकटाच्या वेळी सौ. उषादेवी यांनी धैर्य आणि संयम सोडला नाही. पतीला मृत्यूच्या दाढेतून परत आणण्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले. त्यांच्या या संघर्षात मुलगा ॲड. अनिकेतसिंह कटरे यानेही मोलाची भूमिका बजावली. कॉर्पोरेट क्षेत्रातील आशादायी कारकीर्द सोडून तो गावी परतला आणि आई-वडिलांच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले. आज तो आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतीची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत आहे.

या कुटुंबातील संस्कारांची परंपरा पुढील पिढीतही दिसून येते. सून ज्युनियर कॉलेजमध्ये व्याख्याता आहे, तर कन्या पुण्यात कार्यरत आहे. जावई टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. मुलांना चांगले संस्कार देऊन त्यांना कर्तव्यदक्ष आणि जबाबदार नागरिक बनविणे, हे या दाम्पत्याच्या यशस्वी गृहस्थाश्रमाचे मोठे फलित म्हणावे लागेल. आज वयाच्या या टप्प्यावरही ॲड. लखनसिंह कटरे यांची सामाजिक बांधिलकी कायम आहे. ते गोंदिया न्यायालयात अधिवक्ता म्हणून कार्यरत असून सहकार क्षेत्रातील विविध प्रकरणांमध्ये मार्गदर्शन करतात. तसेच ज्येष्ठ नागरिक सेवा संघ आणि निवृत्त अधिकारी संघाच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्यही करीत आहेत. लखनसिंह कटरे यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, प्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठा आणि जिद्दीचा प्रवास आहे. या प्रवासात सौ. उषादेवी कटरे यांची साथ, त्याग आणि समर्पण हे त्यांच्या यशाचे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले आहेत. या आदर्श व्यक्तिमत्वाला मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाला पुढील अनेक वर्षे निरोगी, आनंदी आणि समाजासाठी मार्गदर्शक ठरो, हीच सदिच्छा.●●



रवींद्र दांडगे
94045 45238

# वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

## अभिनंदन नागेश सरबौद्ध म्हणजे बहुसंख्या बहुजन स्पष्टपणे सांगितल्याबद्दल

दिनांक 25 मे 2026 च्या सोमवारच्या बहुजन सौरभच्या अंकात ज्येष्ठ भूजल शास्त्रज्ञ आणि बहुजन विचारवंत आयुष्यमान नागेशी चौधरी यांचा बहुजनांनी स्वराष्ट्रासाठी आक्रमक व्हावे अशा मथळ्याचा लेख बहुजन मानस या स्तंभात आलेला आहे त्यात निर्भीडपणे वैचारिक प्रगल्भतेचा ठसा भारतीय जनमानसावर उमटविण्याचा भरघोस प्रयत्न यशस्वी ठरण्याकरता मंगल कामना करताना अभिनंदन करण्यासाठी 'बौद्ध'जन प्रयत्नांची पराकाष्टा करतील अशी आशा अन अपेक्षा केल्याशिवाय राहवत नाही कारण आपण बहुजन विचारवंत तर आहातच सोबत बहुजन उच्चशिक्षित नेते सुद्धा आहात. नागपूरच्या नव्हे तर महाराष्ट्रातील बहुजनांनीच नव्हे तर भारत देशातील कोट्यावधी लोकांनी ध्यानात तर नव्हे तर मनात कोरण्यासारखा लेख लिहून बौद्धांवर उपकारकर्ते तर ठरतातच पण बहुजनांना खडबडून जागे करण्याची संधी आपण प्राप्त करून दिलेली आहे.

- मधुकर गोपीचंद बोरीकर

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प 164

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येवला जि. नाशिक



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा केलेल्या नाशिक जिल्ह्यातील येवला येथील हा पुतळा दिशादर्शक पुतळा आहे. समता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणारी ही भूमी परिवर्तनाच्या इतिहासाची साक्ष देणारी प्रेरणास्थळ आहे. बाबासाहेबांचे विचार आणि संघर्ष आजही समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य करते. येथे अभिवादन कार्यक्रम होतात.

संवाद मित्र, राष्ट्रपाल सावंत
मो. 9430144356

# सामाजिक बांधिलकीसाठी दान देणे गरजेचे : पुरुषोत्तम गाणार



**पुणे :** समाजासाठी कार्य करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असून आयुष्याच्या उर्वरित काळात समाजहितासाठी योगदान देणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार दान देण्याची भावना जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन कर्मचारी नेते पुरुषोत्तम गाणार यांनी केले.रहाटणी-पिंपळे सौदागर येथील वीर संभाजी ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या वतीने संघाचे ज्येष्ठ सदस्य आप्पासाहेब कांबळे, रमेश बोधी आणि बुवासाहेब अहिवळे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ वीर संभाजी उद्यान येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी संघाचे माजी अध्यक्ष भिमराव सरोदे, डॉ. डी.एस. कोरे आणि पुरुषोत्तम गाणार यांच्या हस्ते सत्कारमूर्तींना गुलाबाच्या पुष्परोपाची कुंडी व पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन पुरुषोत्तम गाणार यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींना निरोगी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. संघाचे बोधवाक्य "ज्ञान, आरोग्य, मनोरंजन आणि सामाजिक जाणीव" असे असून त्यानुसार संघ विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, बौद्ध विहारांना सहकार्य, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना मदत, आरोग्यविषयक जनजागृती, सहली, मनोरंजनात्मक कार्यक्रम तसेच कौटुंबिक स्नेहसंमेलने अशा विविध उपक्रमांद्वारे संघ सामाजिक बांधिलकी जपत आहे. या उपक्रमांमध्ये सदस्यांसह त्यांच्या कुटुंबीयांचाही उत्स्फूर्त सहभाग असतो. यावेळी भिमराव सरोदे यांनी ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्यविषयक समस्या निःसंकोचपणे मांडून परस्पर सहकार्याची भावना जोपासावी, असे आवाहन केले. डॉ. डी.एस. कोरे यांनी संघाच्या कार्याचा नियमित आढावा घेऊन त्रुटी दूर करण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येकाने आपल्या कार्याचे आणि गुणांचे सिंहावलोकन करून उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी सांगितले. सत्कारमूर्ती आप्पासाहेब कांबळे यांनी नियमित दिनचर्या, शिस्तबद्ध जीवनशैली आणि संतुलित आहार हे निरोगी आयुष्याचे रहस्य असल्याचे नमूद केले. संघाचे अध्यक्ष तथा सत्कारमूर्ती रमेश बोधी यांनी संघकार्य करताना स्वतःतील उणिवा दूर करून अधिक चांगले कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच संघाचे बोधवाक्य आचरणात आणण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. बुवासाहेब अहिवळे यांनी संघाने व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी पुढील काळात अधिक सक्रियपणे कार्य करणार असल्याचे सांगितले.

# आंबेडकराइट्स बुद्धीस्ट सोसायटी द्वारा धम्म मार्गदर्शन



**संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर :** मुक्ती चा खरा मार्ग धर्मांतर या विषयवार चर्चासत्र मांतर शहिद स्मारक दहा नं.पुल, इंदोरा, नागपूर या ठिकाणी आंबेडकराइट्स बुध्दीस्ट सोसायटी व्दारा आयोजित केले होता. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता म्हणुन मार्गदर्शन करतांना ॲड. मीलिंद पखाले यांनी जनगणनेत बौद्ध लिहा भूम आणि भितीच्या जाडयात अडकू नका जनगणनेत शेंदुर फासणा-यांना फेकून द्या. ऐतिहासिक दृष्ट्या आणि सांस्कृतिक दृष्टया आपण बौद्ध आहोत असे मत व्यक्त केले. जगाचा उध्दार फक्त बुध्द धम्माच्या शिकवणी मुळेच होऊ शकतो असे उदगार कार्यक्रमाचे अध्यक्ष शुभम डहाट यांनी व्यक्त केले. ॲड. अर्चना डोंगरे, शेखर सांगोडकर यांनी सुध्दा आपले मत मांडले. प्रास्तविक राजू कापसे यांनी, संचालन वैशाली नगरारे आभार प्रदर्शन मोनिका जामगडे यांनी केले. कार्यक्रमाला माजी मंत्री यशवंत निकोसे यांचा सहभाग होता. योगेश गजभिये, निलीमा डंबारे, लिना काटकर, राजकुमार रंगारी, राजीव अंबादे, दिनेश धमगाये यांनी कार्यक्रम सफल करण्यासाठी सहकार्य केले.

## महत्वाचे

### ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.एस. सुब्रमण्यम यांचे नवी मुंबईत निधन



**नागपूर :** वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (WCL) चे माजी वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.सुब्रमण्यम यांचे मंगळवारी 27 मे रोजी, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक व मित्र परिवारातील हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

डॉ. सुब्रमण्यम हे नागपूर येथील गोमती अपार्टमेंट, लॉ कॉलेज चौक येथील रहिवासी होते. आपल्या सेवाकाळात त्यांनी रुग्णसेवा व सामाजिक बांधिलकी जपत अनेकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. शनिवारी 30 मे 2026 रोजी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी, माजी सहकारी तसेच अनेक शुभचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार आणि आप्तपरिवार आहे.

### केडीएमटीच्या भरारी पथक प्रमुखपदी संतोष हेरोडे यांची निवड



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन (केडीएमटी) सेवेच्या भरारी पथक प्रमुखपदी संतोष हेरोडे यांची निवड करण्यात आली आहे. १९९९ मध्ये वाहक म्हणून सेवेत रुजू झालेल्या हेरोडे यांनी प्रभारी वाहतूक नियंत्रक व प्रभारी मार्ग तपासणीस अशी विविध पदे सांभाळत ही उल्लेखनीय प्रगती साधली.

या निवडीबद्दल आनंद व्यक्त करताना हेरोडे यांनी परिवहन व्यवस्थापक डॉ. विजयकुमार व्दासे व आगार व्यवस्थापक दीपक चौधरी यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. केडीएमटीच्या प्रगतीसाठी आणि प्रवासी सेवेत शिस्त, सुरक्षितता व पारदर्शकता वाढविण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

हेरोडे यांच्या निवडीचे केडीएमटीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. कोरोना काळासह विविध आपत्कालीन परिस्थितीत दिलेल्या उल्लेखनीय सेवेमुळे त्यांना यापूर्वी 'उत्कृष्ट कर्मचारी' म्हणून गौरविले होते.

### विठ्ठल पाटील यांच्या 'मायनस शून्य' पुस्तकाचे ६ जून रोजी प्रकाशन




**पिंपरी-चिंचवड, प्रतिनिधी :** मराठी साहित्यविश्वात एका नव्या वैचारिक प्रवासाची नोंद करणाऱ्या लेखक विठ्ठल पांडुरंग पाटील लिखित आणि पेन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशित 'मायनस शून्य' या स्वकथनात्मक पुस्तकाचा भव्य प्रकाशन सोहळा शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा पिंपरी-चिंचवड येथील बर्ड व्हॅली, पिंपळे सौदागर येथे संपन्न होणार असून साहित्य, कला, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. पुस्तकाचे प्रकाशन डॉ. संदीप सांगळे, अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रज्ञा बागुल या राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून यशवंत शितोळे, देवा झिंजाड आणि संतोष संखद उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलाक्षी काळे-सालके करणार आहेत.'मायनस शून्य' हे स्वकथन लेखकाच्या जीवनप्रवासातील संघर्ष, अनुभव, सामाजिक जाणीवा आणि वैचारिक चिंतन यांचे प्रतिबिंब मांडणारे पुस्तक असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने साहित्यप्रेमींना लेखकाच्या अनुभवविश्वाशी जवळून परिचित होण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन विजया विठ्ठलराव पाटील, रश्मी नितीन पाटील आणि श्वेता आशीष मनवर यांनी केले असून, साहित्यप्रेमी, वाचक, लेखक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# वनराई समाधान शिबिर व वनराई माहितीपट प्रदर्शन



**संवाद मित्र सुनिल भगत नागपूर :** वनराई स्वयंसेवी संस्था, गडचिरोली यांच्या वतीने वनराई समाधान शिबिर व माहितीपट प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन २६ मे २०२६ रोजी आमदार निवास, नागपूर येथे करण्यात आले. शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वनराई संस्थेच्या उपक्रमांना या कार्यक्रमातून व्यापक प्रतिसाद मिळाला.

गेल्या ३० वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यात विविध ठिकाणी शासकीय वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. चंद्रसुरेश डोंगरवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. कार्यक्रमात संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन गोविंद पोतदार, अध्यक्ष, रामकृष्ण हॉस्पिटल, वर्धमाननगर (नागपूर) आणि रामदेव अग्रवाल, उपाध्यक्ष, समृद्ध भारत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संगीता वालदे, प्रमुख, समृद्ध भारत महिला बचत गट या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात डॉ. सुनील भगत, कार्याध्यक्ष तसेच देवयानी भगत, राज्य महिला सहकार्यवाह, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर यांनी वनराई संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत संस्थेला शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. सतीश मेश्राम (अस्थीशल्य चिकित्सक), प्रभानंद बावणे (वरिष्ठ अभियंता, इस्पात), शिवाजी जाधव (शिक्षक), अनिल वाघ (सेवादल कार्यकर्ता), अरुण केदार (विदर्भ राज्य आंदोलन समन्वयक), मुकेश मसुरकर (युवा अध्यक्ष, विदर्भ राज्य), प्रताप काशीकर (शंकानाद), चंदा मोटघरे, कामिनी बनकर (राजसाक्षी), सुषमा डबराल (मनकी आवाज), दामोदर रामटेके आणि संजय रामटेके आदी मान्यवरांनी आपले अनुभव कथन केले व सामाजिक कार्यातील विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे रबीमोहन जोशी यांनी निर्मित केलेल्या वनराई विषयक माहितीपटाचे प्रदर्शन. उपस्थितांनी माहितीपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत संस्थेच्या कार्याचा गौरव केला. समारोपप्रसंगी डॉ. चंद्रसुरेश डोंगरवार यांनी वनराई स्वयंसेवी संस्थेची उद्दिष्टे, ग्रामीण भागातील विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम आणि भविष्यातील योजनांची माहिती दिली. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकासासाठी कार्य करण्याचा संस्थेचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. दिवसभर चाललेल्या या शिबिरात २०० हून अधिक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले.

# बसपाद्वारे माई आंबेडकरांना स्मृतीदिनी अभिवादन



**नागपूर :** भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुसऱ्या पत्नी डॉ शारदा कबीर म्हणजेच डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांचा 23 वा स्मृति दिवस कही हम भूल ना जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत रामेश्वरी येथील बसपाच्या शहर कार्यालयात माल्यार्पण व अभिवादन करून संपन्न झाला. याप्रसंगी बसपा नेत्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेबांचे वयाच्या चौदाव्या वर्षी 4 एप्रिल 1906 रोजी रमा धोत्रे या आठ वर्षाच्या मुली सोबत तत्कालीन परंपरेनुसार विवाह (बाल) झाला. रमाई चे 1935 ला आजाराने निधन झाले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब तेरा वर्षे पर्यंत एकाकी पडले होते. डॉ. बाबासाहेबांना अनेक प्रकारच्या व्याधी (रोग) असल्याने व त्यांना 24 तास वैद्यकीय सेवेची गरज असल्याने डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांनी वयाच्या 57 व्या वर्षी 39 वर्ष वयाच्या डॉ सविता कबीर ज्या डॉ. बाबासाहेबांच्या परिचित होत्या व त्यांची वैद्यकीय सेवा करीत होत्या, त्यांचेसोबत नोंदणीपद्धतीने (कायदेशीर) विवाह (प्रौढ) केला. डॉ सविता आंबेडकरांच्या योगदानाबद्दल बोलताना म्हणाले की याच कालावधीत डॉ. बाबासाहेबांनी भारतीय संविधान लिहिले, जगातील बौद्ध देशांचा दौरा केला, बौद्ध धम्माचा अभ्यास केला, डॉ. सविता कबीर सोबत नागपुरात बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन लाखों अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली. याच दरम्यान डॉ. बाबासाहेबांनी बुद्ध अँड हिज धम्म या ग्रंथाची निर्मिती केली. या उपक्रमामध्ये सविता कबीर ह्या डॉ. बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या होत्या. डॉ सविताच्या सेवेमुळे डॉ. बाबासाहेबांचे जीवन सुखकर झाले. एवढेच नव्हे तर त्यांचे जीवनमान वाढले असे डॉ. बाबासाहेबांनी स्वतः बुद्ध अँड हिज धम्माच्या मूळ प्रस्तावनेत लिहिले आहे. डॉ सविता आंबेडकर यांना फक्त आठ वर्षे डॉ. बाबासाहेबांचे सानिध्य लाभले. डॉ. बाबासाहेबांच्या निर्वानानंतर 47 वर्ष त्या एकाकी जीवन जगल्या. व 29 मे 2003 रोजी त्यांचे निधन झाले. डॉ. बाबासाहेबांचा ऋणी असलेला समाज रमाला रमाई म्हणतो, तर डॉ. सविता माईसाहेब या नावाने ओळखतो. या कार्यक्रमाला बसपाचे उत्तम शेवडे, पंकज नाखले, गजानन पाटील, संभाजी लोखंडे, जगदीश गेडाम, राजेश मून, शामराव तिरपुडे आदि प्रमुख कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# ज्येष्ठ साहित्यिक रा. शे. साळुंके यांचा सत्कार



**नागपूर :** सामान्य माणसाच्या जीवनातील सुख-दुःख, संघर्ष आणि अंतर्मनाचा वेध घेऊन साहित्यनिर्मिती करणारे ज्येष्ठ कथालेखक रा. शे. साळुंके यांनी मराठी साहित्यविश्वात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक जयसिंग वाघ यांनी केले. हरिविठ्ठल नगर येथे रा. शे. साळुंके यांच्या ८७ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी रा. शे. साळुंके यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. जयसिंग वाघ म्हणाले की, रा. शे. साळुंके हे १९६७ पासून सातत्याने लेखन करत असून कथा, एकांकिका, नाटक, कविता तसेच महार संस्कृतीवरील लेखनाद्वारे त्यांनी साहित्यविश्व समृद्ध केले आहे. त्यांच्या आतापर्यंत सुमारे १५ पुस्तकांचे प्रकाशन झाले असून त्यामध्ये सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे वास्तववादी आणि विदारक चित्रण आढळते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर होते. त्यांनी रा. शे. साळुंके यांच्या विविध साहित्यकृतींचा आढावा घेत त्यांच्या साहित्यसेवेचे कौतुक केले. तसेच भविष्यात ₹समग्र रा. शे.₹ या ग्रंथाची निर्मिती करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ. मिलिंद बागुल यांनी साळुंके यांच्या साहित्यिक प्रवासाची माहिती देताना त्यांना प्राप्त झालेल्या वि. स. खांडेकर कथा पुरस्कार सहित सात मानाच्या पुरस्कारांचा उल्लेख केला. कृषी खात्यात तब्बल ३५ वर्षे सेवा बजावल्यानंतर १९९८ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर काही काळ राजकारणात सक्रिय राहूनही त्यांनी लेखनकार्य अखंड सुरू ठेवले. लवकरच त्यांच्या दोन नव्या पुस्तकांचे प्रकाशन होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. सत्काराला उत्तर देताना रा. शे. साळुंके यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, या सन्मानामुळे नवचैतन्य मिळाले असून अधिक जोमाने लेखन सुरू ठेवण्याची प्रेरणा मिळाली आहे. कार्यक्रमात कवी दिलीप सपकाळे तसेच डॉ. सी. यू. भालेराव यांनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी केले. प्रास्ताविक दिलीप तासखेडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. आनंद कोचुरे यांनी केले.

# आनंद ज्येष्ठ नागरिक मंडळात प्रबोधनात्मक कार्यक्रम



**नागपूर :** आनंद ज्येष्ठ नागरिक मंडळ, आनंदनगर-सक्करदरा येथे मासिक सभा, ज्येष्ठ नागरिकांचा स्नेहमिलन सोहळा तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूरचे सचिव राजू मिश्रा अध्यक्षस्थानी होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अशोक दगडे, संजीवनी नॅचरोपॅथी केंद्राचे संचालक डॉ. संजय उगेमुगे, सेवानिवृत्त कर्मचारी प्रतिष्ठान संघटनेचे अध्यक्ष नारायण (नाना) समर्थ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मंडळाचे उपाध्यक्ष मधुकरराव दहिकर व सचिव काशिनाथ ठवरे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मधुकरराव दहिकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय उगेमुगे यांनी ज्येष्ठांनी स्वतःचे आरोग्य कसे जपावे, संतुलित आहाराचे महत्त्व काय आहे आणि आनंदी व निरोगी जीवनशैली कशी अंगीकारावी याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी अशोक दगडे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत वाढीव निवृत्ती वेतनासंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. राजू मिश्रा यांनी ज्येष्ठांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आनंदी राहावे, समाजात आनंद वाटावा आणि सक्रिय जीवनशैली स्वीकारावी, असा संदेश दिला. नारायण समर्थ यांनीही ज्येष्ठांच्या जीवनातील अनुभवांचे महत्त्व अधोरेखित करत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यानंतर मंडळातील सदस्यांच्या पाल्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. तसेच इंदुमती दहिकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आणि दहिकर दांपत्याच्या विवाहवर्धापन दिनानिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मे महिन्यात वाढदिवस असलेल्या सर्व सदस्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. संचालन प्रणोती कळमकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मधुकरराव दहिकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आंबटकर, प्रतिमा काळे, जिरापुरे, नीता भुते, सुलाखे आदींनी विशेष सहकार्य केले.

# जयभीम बुद्ध विहारात वक्तृत्व स्पर्धा

## रागिणी बावनकुळे प्रथम; मनीष ठाकरे द्वितीय तर आर्या जाधव तृतीय



**सिंदी (मेघे) :** येथील जयभीम बुद्ध विहारातील जयभीम धम्मशाळेच्या वतीने तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव, आई रमाई स्मृतीदिन तसेच धम्मशाळेच्या वर्षपूर्तीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत स्मृतीशेष रमेशजी डांगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ₹आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर₹ या विषयावर खुली वक्तृत्व स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेचे मुख्य आयोजक अमित डांगे तर स्पर्धा संयोजक प्रा. राजेश डंभारे होते. अमरावती, अकोला, बुटीबोरी, हिंगणघाट, आष्टी आणि वर्धा येथून एकूण २४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा वेध घेतला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. ज्ञानेन्द्र मुनेश्वर आणि पंकज वंजारे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रमोद जगताप होते, तर प्रमुख वक्त्या म्हणून ॲड. डॉ. विद्याताई राईकवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मारोतराव डंभारे, सिद्धार्थ मून, अमित डांगे, रजनीश डांगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत टाकळघाट येथील रागिणी बावनकुळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मनीष ठाकरे (आष्टी) यांनी द्वितीय तर आर्या जाधव (अकोला) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. मैत्री रामटेके यांना प्रथम प्रोत्साहनपर तर स्पृहा ताकसांडे यांना द्वितीय प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्पर्धेचे प्रथम ३००० रु., द्वितीय २००० रु., तृतीय १००० रु. आणि दोन प्रोत्साहनपर पुरस्कार प्रत्येकी ५०० रु. सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र अमित डांगे यांचेकडून प्रायोजित असून हे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन विजेत्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समय मून यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राजेश डंभारे यांनी केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सिद्धार्थ मून, अमित डांगे, समय मून, कविश कांबळे, सार्थक मून, धम्मशील लढे, सम्राट मून, हर्षवर्धन म्हैसकर, अर्णव जगताप, विवान कांबळे, प्रयासी डंभारे, सृष्टी इंगळे, स्वीकृती वानखेडे, समृद्धी भगत, मेधावी डांगे, रोमिशा वाघमारे आदींनी विशेष परिश्रम घेतले. ही स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली.

# शुद्धचित्त बुद्ध विहारातील सहादिवसीय बाल धम्म संस्कार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नागपूर :** विश्वशांती बहुउद्देशीय विकास संस्थेच्या वतीने शिवशक्ती नगर, मानेवाडा रिंग रोड येथील शुद्ध चित्त बुद्ध विहारात आयोजित करण्यात आलेले सहादिवसीय बाल धम्म संस्कार शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. हे शिबिर २५ मे ते ३० मे दरम्यान दररोज सकाळी ७ ते १०.३० या वेळेत आयोजित केले होते. शिबिरामध्ये नागपूर शहरातील १० ते १८ वर्षे वयोगटातील एकूण ४७ मुला-मुलींनी सहभाग घेतला. शिबिराचे आयोजन भंते संघरतन शाक्य यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. शिबिरादरम्यान भंते संघरतन शाक्य यांनी शिबिरार्थींना त्रिशरण, पंचशील, आनापान ध्यान साधना, मंगल मैत्री, दहा पारमिता, चार आर्यसत्य आणि आर्य अष्टांगिक मार्ग याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच भंते दीपंकर बोधी यांनी मुलांमध्ये चांगल्या सवयी व नैतिक मूल्ये रुजावीत या उद्देशाने नैतिक धम्म संस्कारांचे धडे दिले. याशिवाय संगीत शिक्षक भूषण मेश्राम यांनी शिबिरार्थींना गीतगायनाचे प्रशिक्षण दिले. शिबिरामध्ये चित्रकला स्पर्धा, विविध मनोरंजक खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे उपक्रमही घेण्यात आले. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये बालकांवर धम्म संस्कार रुजावेत, त्यांनी धार्मिक व नैतिक मूल्यांचा स्वीकार करून आदर्श नागरिक म्हणून घडावे तसेच बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करावा, या उद्देशाने शुद्ध चित्त बुद्ध विहारात दरवर्षी अशा धम्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येते. शिबिराच्या समारोप कार्यक्रमात विश्वशांती बहुउद्देशीय विकास संस्थेचे अध्यक्ष भंते प्रज्ञानंद महास्थवीर यांच्या हस्ते सर्व शिबिरार्थींना सन्मानपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'बुद्ध पूजा वंदना' आणि 'उपासकाचे कर्तव्य' ही पुस्तके भेट देऊन गौरविले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सचिव भंते संघरतन शाक्य, कोषाध्यक्ष भंते दीपंकर बोधी, भंते सुबोध, भंते बोधीप्रिय, भंते बुद्धपाल, भंते शिवली तसेच उपासक प्रशिक नागदेवे, उज्वल तिरपुडे, निलेश बुलकुंडे, सुनंदा गजघाटे, प्रीती तिरपुडे आणि योगिता तिरपुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे सहभागी विद्यार्थ्यांमध्ये धम्म, शिस्त, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648